College UID No.CAAA016190

२०१९-२०

# अगस्त्य



प्रकाशक : डॉ.भास्कर शेळके

संपादक : प्रा.केशव नाईकवाडी

**Agastya**
My College Magazine
Web : www.eagastya.in

साहसे श्रीः प्रतिवसति।

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,

ISO 9001:2015

## अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

नॅक मानांकन A

ता. अकोले, जि. अहमदनगर (पिन ४२२६०१)

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY BEST COLLEGE AWARD FIRST PRIZE WINNER - 2007

# अगस्त्य

२०१९-२०

## संपादक मंडळ



साहसे श्रीः प्रतिवसति।

**अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,**

# अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

**ता. अकोले, जि. अहमदनगर**

(पिन ४२२६०१, दुरध्वनी ०२४२४ - २२१२४८)

# अगस्त्य

## नियतकालिक

२०१९-२०

**प्रकाशक**

**प्राचार्य डॉ. भास्कर शेळके**

**संपादक**

**प्रा.केशव नाईकवाडी**

**प्रकाशक**

प्राचार्य डॉ.भास्कर शेळके
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते
विज्ञान महाविद्यालय, अकोले

**संपादक**

प्रा.केशव नाईकवाडी

**संपादक सदस्य - वरिष्ठ महाविद्यालय**

प्रा.सोपान साळवे
प्रा.डॉ.सुनील घनकुटे
प्रा.गोरख इदे
प्रा.धनराज हाडुळे
प्रा.प्रदीप बच्छाव

**संपादक सदस्य - कनिष्ठ महाविद्यालय**

प्रा.बाळासाहेब शेटे
प्रा.सुधीर राक्षे
प्रा.चांगदेव डोंगरे
प्रा.रोहिणी डावरे

**कार्यालयीन व्यवस्थापन**

श्री.चंद्रभान ढवळे

**मुखपृष्ठ, ले - आऊट ॲण्ड ग्राफीक्स्**

**श्री.हेमंत कुसळकर**

**वेबसाईट डेव्हलपींग**

**प्रा.प्रदीप बच्छाव**

**मुद्रण**

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले
ता.अकोले, जि.अहमदनगर (४२२६०१)

## वार्षिक नियतकालिक

दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स, नियम ८ फॉर्म ४
प्रमाणे आवश्यक माहिती

**प्रकाशन स्थळ :** अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे, अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले ता.अकोले, जि. अहमदनगर

**प्रकाशन काळ :** वार्षिक

**प्रकाशक :** प्राचार्य डॉ.भास्कर शेळके

**पत्ता :** अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले ता.अकोले, जि. अहमदनगर

**संपादकाचे नाव:** प्रा.केशव नाईकवाडी

**राष्ट्रीयत्व :** भारतीय


**मालकी :** अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले ता.अकोले, जि. अहमदनगर

मी प्राचार्य डॉ.भास्कर शेळके जाहीर करतो की,
वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

**प्राचार्य डॉ.भास्कर शेळके**
प्रकाशक

...

सदर अंकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या साहित्यातील
मतांशी संपादक मंडळ व प्रकाशक
सहमत असतीलच असे नाही.




अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालयाच्या उत्कृष्ट परंपरा असलेल्या 'अगस्त्य' या नियतकालिकाच्या 'अगस्त्य': २०१८-१९ या अंकाचा प्रकाशन सोहळा ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री मा.शरदराव काळे, संस्थेचे कार्यकारी विश्वस्त माजी आदिवासी विकास मंत्री मा.मधुकररावजी पिचड साहेब, संस्थेचे अध्यक्ष मा.जे.डी.आंबरे पाटील, सहसेक्रेटरी ॲड.भाऊसाहेब गोडसे तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य, उपप्राचार्य या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

या अंकाचा प्रकाशन सोहळा संपन्न होत असताना आम्हा सर्व संपादक मंडळ सदस्यांच्या मनामध्ये आनंदाची भावना निर्माण होत होती. संपादक म्हणून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे साहित्य, विविध क्षेत्रातील कामगिरींचे प्रतिबिंब या अंकाच्या निमित्ताने आपणासमोर मांडताना विशेष आनंद होत होता.

मा.शरदराव काळे यांनी या अंकाचे कौतुक करताना अंकामध्ये समाविष्ट विद्यार्थ्यांच्या साहित्याचा मागोवा घेतला व अंकाची सर्वसमावेशकता यावर लक्ष वेधले. शेवटी पुढील वर्षाच्या अंकाच्या रुपरेषेबद्दल काही अपेक्षा व्यक्त करुन संपादक मंडळ सदस्यांना व संगणकीय अक्षरजुळवणीकारांना प्रमाणपत्रे व शुभेच्छा दिल्या.

प्रा.के.बी.नाईकवाडी,
संपादक, अगस्त्य-२०१८-१९

# अंतरंग

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्यांचे मनोगत | ५ |
| २. | संपादकीय | ६ |
| ३. | कनिष्ठ महाविद्यालय: स्थानिक व्यवस्थापन समिती | ७ |
| ४. | महाविद्यालयीन समित्या | ८ |
| ५. | मराठी विभाग | ९ |
| ६. | हिंदी विभाग | ३० |
| ७. | अहवाल | ३६ |
| ८. | कर्मचारी वृंद | ५७ |

# प्राचार्यांचे मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्रहो!

ज्ञान व संस्कृती यांचे आदान प्रदान घडविणाऱ्या या व्यासपिठावरुन बोलताना पहिली आनंदाची घटना तुम्हाला सांगाविशी वाटते ती म्हणजे या ही वर्षी महाविद्यालयातील नालंदा अभ्यास केंद्र, एन.सी.सी. मधून अनेक मुले ही नोकरीमध्ये रुजू होऊन देश सेवा करत आहेत.

आपल्या अशा विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांचा अविष्कार फुलवणारे 'अगस्त्य' हे वार्षिक दरवर्षीप्रमाणे तुमच्या सर्वांच्या अविष्काराचे प्रतिक आहे. सध्याचा निसर्ग म्हणजे मानवाच्या आततायी पणावर दंड ठोकूनच जणू काही उभा आहे. याचे वास्तव चित्रण संपूर्ण जगाने जे हेरले ते पूर परिस्थिती, देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला तो चंद्रयान मोहिम व ३७० हे कलम जम्मु काश्मिर मधून संपुष्टात होणे, या सर्व देश पातळीवरील विषयांचा 'अगस्त्य' मध्ये मागोवा घेण्यात आलेला आहे. त्याबद्दल मी तुम्हा सर्व विद्यार्थ्यांचे, प्रमुख संपादक, प्रा. के. बी. नाईकवाडी व संपादक मंडळाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

यावर्षी महाविद्यालयात महिला सबलीकरण, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत घेतलेल्या लोककला महोत्सवात प्रथम क्रमांक व डी.डी. सह्याद्रीवरील 'धिना धीन धा' लोकनृत्य स्पर्धेत आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या प्रथम क्रमांक, तसेच विद्यार्थी विकासासाठी उच्चांकी कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आले. या सर्व कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी सर्व पातळ्यांवर सर्वोतोपरी सहभागी राहिले हे इथे नोंदवावेसे वाटते.

धन्यवाद!

- प्राचार्य डॉ.भास्कर शेळके

# संपादकीय

विद्यार्थी मित्रहो,

आपल्या प्रतिभेच्या हक्काचे व्यासपिठ असणारे 'अगस्त्य' २०१९-२० आपल्या स्वाधीन करताना मला मनस्वी आनंद होत आहे. आपल्या सृजनाचा हा सुंदर आविष्कार नवीन विश्वाची नांदी ठरावी ही अपेक्षा. आपले सुज्ञ विचार, सामाजिक भान, कल्पनाशक्ती व त्यानुसार कृती करण्याची आपली इच्छा शक्ती आपल्या प्रत्येक शब्दाशब्दातून जागवत आहे. तुमच्याजवळ असलेले तारुण्याचे अमर्याद सामर्थ्य या सामर्थ्याच्या विनाशासाठी नव्हे, तर जगाला वाचविण्यासाठी सध्याच्या काळात होणारा उपयोग यासाठी तुमच्याशी काही संवाद साधण्याचा माझा मानस आहे.

मित्र हो, आज मोबाईलच्या अति वापरामुळे वाचन संस्कृती, लेखन संस्कृती व आपापसातील संवाद अतिशय दुर्मिळ गोष्ट होत चाललेला आहे.

मित्र हो, आपण सर्वजण भारत मातेचे पुत्र होत. २०१९ वर्षे पाहिले तर 'एका डोळ्यात आसू तर दुसऱ्या डोळ्यात हासू' अशी अवस्था आपली सर्वांची झाली आहे. मानसाच्या हव्यासापाई आज माणूसच माणसाचा मारेकरी झाला आहे की काय? असा प्रश्न आ वासून उभा आहे. पावसाच्या भयानक पूर परिस्थितीने संपूर्ण महाराष्ट्रात घातलेल्या थैमानाने शून्यातून निर्माण केलेला संसार, शेतकऱ्यांची दूर्दशा, पैशाने कितीही मोठा झालेला माणूस एका क्षणात होत्याचं नव्हत करणारा हा निसर्ग याचा रुद्रावतार म्हणावा लागेल, याने खरे माणसाच्या माणुसकीतले दर्शन घडवून आणले.

आपल्या ज्ञानाची सांगड घातल्यास स्वर्गही आपण आपल्या पुढे ठेंगणे करु शकतो, याचे दर्शन चंद्रयान मोहिमेतून संपूर्ण जगाला दाखवून देण्याचे काम आपण केले. ३७० कलम काश्मिर मधून संपुष्टात आणून संपूर्ण देश तिरंगामय झाला ते साजरे करण्याचे हे वर्ष.

हे नियतकालिक पूर्णत्वास नेण्यास संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व संपादक मंडळातील सर्व सदस्य, मुद्रण व्यवस्थापक श्री.हेमंत कुसळकर या सर्वांनी मला साथ दिली त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. हा अंक आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होतो आहे.

प्रा.केशव नाईकवाडी

# विश्वस्त मंडळ



## मा.श्री.मधुकररावजी पिचड साहेब
कार्यकारी विश्वस्त

कायम विश्वस्त



मा.श्री.सीताराम पा.गायकर

कायम विश्वस्त



मा.आ.वैभवराव पिचड

स्वीकृत विश्वस्त



मा.डॉ.बाळकृष्ण बंगाळ

स्वीकृत विश्वस्त



मा.श्री.दशरथराव सावंत

स्वीकृत विश्वस्त



मा.श्री.मीनानाथ पांडे

# विद्यमान कार्यकारिणी

अध्यक्ष



मा.श्री.जे.डी.आंबरे पाटील

उपाध्यक्ष



मा.श्री.मधुकरराव सोनवणे

सेक्रेटरी



मा.श्री.यशवंतराव आभाळे

सहसेक्रेटरी



मा.ॲड.भाऊसाहेब गोडसे

खजिनदार



मा.श्री.सुरेशराव देशमुख

सदस्य



मा.श्री.अशोकराव भांगरे

सदस्या



मा.सौ.कल्पनाताई सुरपुरिया

सदस्य



मा.ॲड.आनंदराव नवले

सदस्य



मा.श्री.धनंजय संत

सदस्य



मा.श्री.सुधाकरराव देशमुख

सदस्य



मा.श्री.बाळासाहेब भोर

सदस्य



मा.श्री.रमेशराव देशमुख

सदस्य



मा.श्री.राहूल बेणके

सदस्य



मा.श्री.आरिफ तांबोळी

सदस्या



मा.सौ.सुलोचनाताई वैदय

# महाविद्यालय प्रशासन



**डॉ. भास्कर शेळके**
प्राचार्य



**प्रा.डॉ.संजय ताकटे**
उपप्राचार्य, वरिष्ठ महाविद्यालय
आय.क्यु.ए.सी.समन्वयक



**प्रा.डॉ.एस.एम.सोनवणे**
शैक्षणिक व संशोधन समन्वयक
प्रमुख, गुणवत्ता सुधार योजना



**प्रा.डॉ.राहूल वाघमारे**
विद्यार्थी कल्याण अधिकारी



**प्रा.डॉ.सुनील शिंदे**
उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय



**प्रा.नंदलाल काळण**
पर्यवेक्षक



**श्री.चंद्रभान ढवळे**
प्रबंधक

# महाविद्यालय विकास समिती



मा.श्री.जे.डी.आंबरे पा.
अध्यक्ष,अ.ता.ए.सोसायटी



मा.श्री.यशवंतराव आभाळे
सेक्रेटरी,अ.ता.ए.सोसायटी



मा.डॉ.भास्कर शेळके
प्राचार्य

संशोधन क्षेत्र
तज्ज्ञ प्रतिनिधी



प्रा.डॉ.तुकाराम रोंगटे

शिक्षण क्षेत्र
तज्ज्ञ प्रतिनिधी



प्रा.एस.बी.पगारे

उद्योग क्षेत्र
तज्ज्ञ प्रतिनिधी



श्री.नितीन गोडसे

सामाजिक क्षेत्र
तज्ज्ञ प्रतिनिधी



श्री.अनिल गायकवाड

उपप्राचार्य / समन्वयक,
नॅक मुल्यांकन समिती



प्रा.डॉ.संजय ताकटे

शिक्षक प्रतिनिधी



प्रा.डॉ.साहेबराव गायकवाड

शिक्षक प्रतिनिधी



प्रा.देवदत्त शेटे

विभागप्रमुख प्रतिनिधी



प्रा.विश्वनाथ कोटकर

शिक्षक (महिला) प्रतिनिधी



प्रा.डॉ.रंजना कदम

शिक्षकेतर कर्मचारी सदस्य



डॉ.प्रवीण घुले

## स्थानिक व्यवस्थापन समिती
## कनिष्ठ महाविद्यालय

मा.श्री.यशवंत दशरथ आभाळे – अध्यक्ष

मा.श्री.जयराम दगडू आंबरे – सदस्य

मा. श्री. मधुकर दामोधर सोनवणे – सदस्य

मा.ॲड.श्री.भाऊसाहेब गोडसे – सदस्य

मा.श्री.सुरेश पर्वतराव देशमुख – सदस्य

मा.सौ.कल्पनाताई अजित सुरपुरिया – सदस्या

मा.श्री.देविदास महादू चौधरी – शिक्षक प्रतिनिधी सदस्य

मा.डॉ.श्री.सुनील शिंदे – उपप्राचार्य, क.महा.

मा.प्राचार्य डॉ.भास्कर शेळके – पदसिध्द सचिव

# महाविद्यालयीन समित्या

## महिला अत्याचार प्रतिबंधक समिती

| | | |
|---|---|---|
| प्राचार्य डॉ. भास्कर शेळके | - | अध्यक्ष |
| प्रा.डॉ. आर. के. वाघमारे | - | सदस्य |
| प्रा.डॉ.सौ. रंजना कदम | - | सदस्या |
| प्रा.डॉ. सौ. महेजबीन सय्यद | - | सदस्या |
| प्रा.सौ. रेखा लांडगे | - | सदस्या |
| श्रीमती पुष्पावती भुजबळ | - | सदस्या |

**सूचना** : शा.प.व हायकोर्ट याचिका पी.आय.एल.क्र.२०/२०१२ अन्वये विद्यार्थिनी व महिलांच्या बाबत छेडछाड केल्याचे प्रकरण या संस्थेत/महाविद्यालयात खपवून घेतले जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५

## अधिकाऱ्यांची समिती

| | | |
|---|---|---|
| **श्री. चंद्रभान ढवळे** | **प्रा. बाळासाहेब मेहेत्रे** | **प्राचार्य डॉ. भास्कर शेळके** |
| सहाय्यक जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |

## रॅगिंग प्रतिबंधक समिती

| | | |
|---|---|---|
| प्राचार्य डॉ. भास्कर शेळके | - | अध्यक्ष |
| प्रा.डॉ. आर. के. वाघमारे | - | सदस्य |
| प्रा.ॲड.सौ. मंगलाताई हांडे | - | सदस्या |
| श्री. चंद्रभान ढवळे | - | सदस्य |
| मा. पोलीस निरीक्षक | - | सदस्य |
| मा.श्री. प्रकाश नाईकवाडी | - | सदस्य |
| मा.श्री. अमोल वैद्य | - | सदस्य |
| विद्यापीठ प्रतिनिधी | - | पदसिद्ध सदस्य |

## तक्रार निवारण कमिटी

| | | |
|---|---|---|
| प्राचार्य डॉ. भास्कर शेळके | - | अध्यक्ष |
| प्रा. एस. के. मालुंजकर | - | सदस्य |
| प्रा.बी. के. भांगरे | - | सदस्य |
| श्रीमती पुष्पावती भुजबळ | - | सदस्या |

विशेष जिल्हा समाजकल्याण अहमदनगर
अनुसूचित जाती विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी विशेष मार्गदर्शन (शिष्यवृत्ती) माहिती कक्ष

## संपर्क नोडल अधिकारी

**प्रा.डॉ. साहेबराव गायकवाड**
**प्रा. डॉ. संपतराव सोनवणे**
**प्रा. सोपान साळवे**
**मा.डॉ. रंजना कदम**
**प्रा. डॉ. राहुल वाघमारे**

# स्टुडन्ट सोलर अम्बॅसिडर वर्कशॉप




विद्यार्थी सौर दूत कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांना अहिंसेची शपथ देताना शिक्षण निरीक्षक मा.वाळके साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी पवार साहेब, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ.सुनिल शिंदे, प्रा.ए.एम.दातीर आदी.



महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाने आयआयटी मुंबई यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या विद्यार्थी सौर दूत कार्यशाळेत सहभागी विद्यार्थिनी.

# उद्योजकता विकास कार्यक्रम



उद्योजकता विकास कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ.महेजबिन सय्यद, व्यासपिठावर प्रमुख मान्यवर इंजिनिअर मा.सुदाम पवार, उपाध्यक्ष मा.श्री. मधुकरराव सोनवणे, सेक्रेटरी मा.श्री.यशवंतराव आभाळे आदी.



उद्योजकता विकास कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वक्ते, उद्योजक इंजिनिअर मा.श्री.सुदाम पवार.

## वाणिज्य क्षेत्र भेट



वाणिज्य क्षेत्र भेट अंतर्गत श्रमिक मिल्क डेअरी, संगमनेर येथे भेट देऊन माहिती घेताना विद्यार्थी.



वाणिज्य क्षेत्र भेट अंतर्गत आदर्श बुक डेपो, संगमनेर येथे भेट देऊन माहिती घेताना विद्यार्थी.

# कॉमर्स फेस्टिव्हल



वाणिज्य विभागाचे वतीने आयोजित कॉमर्स फेस्टिव्हलचे उद्घाटन करताना अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.जे.डी.आंबरे पाटील, उपाध्यक्ष मा.श्री.मधुकरराव सोनवणे, प्रमुख पाहुणे मोटीव्हेशनल स्पीकर मा.श्री.सुधीर फरगडे, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके व इतर मान्यवर.



वाणिज्य विभागाचे वतीने आयोजित कॉमर्स फेस्टिव्हलमध्ये मिस्टर कॉमर्स असिफ शेख व मिस कॉमर्स अक्षता घुले यांचा गौरव करताना अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे सेक्रेटरी मा.श्री.यशवंत आभाळे, उपप्राचार्य डॉ.संजय ताकटे, विभाग प्रमुख प्रा.सचिन पाळंदे व इतर मान्यवर.

## 'टीचर्स डे'



वाणिज्य विभागाचे वतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित
अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.जे.डी.आंबरे पाटील, उपाध्यक्ष मा.श्री.मधुकरराव सोनवणे,
प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ.संजय ताकटे व इतर मान्यवर.



वाणिज्य विभागाचे वतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी सहभागी झालेले
विद्यार्थी -विद्यार्थिनी यांचेसमवेत मान्यवर.

# नेटवर्क डिजीटल मार्केटींग



महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात 'नेटवर्क डिजीटल मार्केटींग' विषयावरील मार्गदर्शक ओरिफ्लेम मुंबईच्या विभागीय व्यवस्थापक श्रीमती वसुंधरा देशमुख (वाकचौरे) यांचा सत्कार करताना प्रा.एस.के.मालुंजकर. समवेत डॉ.महेजबीन सय्यद, प्रा.देवदत्त शेटे, मयुरी धुमाळ व इतर मान्यवर.



महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात 'नेटवर्क डिजीटल मार्केटींग' विषयावर मार्गदर्शन करताना ओरिफ्लेम मुंबईच्या विभागीय व्यवस्थापक श्रीमती वसुंधरा देशमुख (वाकचौरे.

## 'माय मदर इन माय कॉलेज'



'माय मदर इन माय कॉलेज' उपक्रमातंर्गत आयोजित कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थिनी व माता भगिनी तसेच प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, प्रा.डॉ.महेजबिन सय्यद.



'माय मदर इन माय कॉलेज'उपक्रमातंर्गत आयोजित कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थिनी व माता पालक यांना महाविद्यालयातील ग्रंथालय कामकाजाची माहिती देताना ग्रंथपाल प्रा.प्रदीप बच्छाव, डॉ.प्रविण घुले व प्रा.डॉ.महेजबिन सय्यद.

# महिला सबलीकरण कार्यक्रम



सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन महिला सबलीकरण कार्यक्रमाचे उद्घाटन करताना मान्यवर.



महिला सबलीकरण कार्यक्रमात विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना मा.श्री.आशिष दराडे.



महिला सबलीकरण कार्यक्रमात विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.सौ.भावना अंजनकर.

# राष्ट्रीय सेवा योजना




राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील पुरग्रस्तांसाठी मदत फेरी काढली. कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनिल मोहटे.




राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने तांभोळ येथे आयोजित जलशक्ती अभियानांतर्गत वृक्षारोपणास प्रारंभ करताना अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जे.डी.आंबरे पाटील, सहसचिव ॲड.भाऊसाहेब गोडसे, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनिल मोहटे व स्वयंसेवक.

# राष्ट्रीय सेवा योजना



स्वच्छ भारत – स्वस्थ भारत अभियानांतर्गत गणेश विसर्जन प्रसंगी मुर्ती संकलन करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक. समवेत तहसीलदार मुकेश कांबळे, कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनिल मोहटे.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने तांभोळ येथे श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात सहभागी झालेले स्वयंसेवक विद्यार्थी.

## तनिष्का



महाविद्यालयातील 'तनिष्का' उपक्रमांतर्गत मेहेंदीचे प्रशिक्षण घेताना विद्यार्थिनी.




महाविद्यालयातील 'तनिष्का' उपक्रमांतर्गत ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण घेताना विद्यार्थिनी.

# उन्नत भारत अभियान




'उन्नत भारत अभियानांतर्गत' आंबड येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.
यावेळी सहभागी शिबीरार्थी व उन्नत भारत अभियानाचे प्रमुख डॉ.सुरिंदर वावळे.




'उन्नत भारत अभियानांतर्गत' टाकळी येथे शासनाच्या वतीने ग्रामस्थांना पुस्तक वाटप
करताना उन्नत भारत अभियानाचे प्रमुख डॉ.सुरिंदर वावळे, प्रा.पुंडे व इतर.

# युवा माहिती दूत



युवा माहिती दूत कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.सुनिल मोहटे. व्यासपिठावर संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री.मधुकरराव सोनवणे, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, डॉ.महेजबिन सय्यद व मान्यवर.



युवा माहिती दूत कार्यक्रमास उपस्थित 'अनुलोम' शिर्डीचे उपविभाग प्रमुख बाळासाहेब मुळे, जनसेवक विजय वाघ, यांचा सत्कार करताना संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री.मधुकरराव सोनवणे, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके आदी.

## आजीवन व अध्ययन विस्तार विभाग



आजीवन व अध्ययन विस्तार विभागाच्या वतीने 'कायदा साक्षरता' उपक्रम राबविण्यात आला. प्रसंगी मान्यवर ॲड.एस.व्ही.गिरी यांचा सत्कार करताना अध्यक्ष जे.डी.आंबरे पाटील. समवेत सहसचिव ॲड.भाऊसाहेब गोडसे, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, प्रा.डॉ.विजय शेडगे आदी.



आजीवन व अध्ययन विस्तार विभागाच्या वतीने 'कायदा साक्षरता' उपक्रमात मार्गदर्शन करताना संस्थेचे सहसचिव ॲड.भाऊसाहेब गोडसे.



आजीवन व अध्ययन विस्तार विभागाच्या वतीने 'कायदा साक्षरता' उपक्रमात मार्गदर्शन करताना अकोले न्यायालयाच्या वकील ॲड.एस.व्ही.गिरी.

# कुमारवयीन मुला-मुलींचे शिक्षण

कुमारवयीन मुलामुलींचे शिक्षण या विषयावर मार्गदर्शन करताना ॲड.निशाताई शिवुरकर.



कुमारवयीन मुलामुलींचे शिक्षण या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.आसीफ तांबोळी.



कुमारवयीन मुलामुलींचे शिक्षण या विषयावर मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष मा.जे.डी.आंबरे पाटील.



## वरिष्ठ महाविद्यालय, क्रीडा विभाग

कु.काजल ताजणे हिची सावित्रीबाई फुले विद्यापिठाच्या योग संघात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योग राष्ट्रीय सपर्धेसाठी निवड झाल्याबद्दल गौरविताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.सिताराम पा.गायकर, उपाध्यक्ष मा.मधुकरराव सोनवणे, सेक्रेटरी मा.यशवंतराव आभाळे आदी.





कु.प्राजक्ता वाघमारे हिची आंतरविभागीय सॉफ्टबॉल, बेसबॉल, नेटबॉल स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल गौरविताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.सिताराम पा.गायकर, उपाध्यक्ष मा.मधुकरराव सोनवणे, सेक्रेटरी मा.यशवंतराव आभाळे आदी.

कु.निकीता क्षिरसागर हिची आंतरविभागीय सॉफ्टबॉल, बेसबॉल व नेटबॉल स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल गौरविताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.सिताराम पा.गायकर, उपाध्यक्ष मा.मधुकरराव सोनवणे, सेक्रेटरी मा.यशवंतराव आभाळे आदी.





कु.अक्षदा पारधी हिची आंतरविभागीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा संघात निवड झाल्याबद्दल गौरविताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.सिताराम पा.गायकर, उपाध्यक्ष मा.मधुकरराव सोनवणे आदी.

## वरिष्ठ महाविद्यालय, क्रीडा विभाग



कु.अक्षय पाडेकर याची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नेटबॉल संघात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेटबॉल राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल गौरविताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.सिताराम पा.गायकर, उपाध्यक्ष मा.मधुकरराव सोनवणे,सेक्रेटरी मा.यशवंतराव आभाळे आदी.



कु.तौसिफ मुलाणी याची आंतरविभागीय सॉफ्टबॉल, नेटबॉल, बेसबॉल, आणि हॅण्डबॉल स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा विभागीय संघात निवड झाल्याबद्दल गौरविताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.सिताराम पा.गायकर, उपाध्यक्ष मा.मधुकरराव सोनवणे, सेक्रेटरी मा.यशवंतराव आभाळे आदी.

कु.धोंडीराम डोके याची आंतरविभागीय नेटबॉल स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा संघात निवड झाल्याबद्दल गौरविताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.सिताराम पा.गायकर, उपाध्यक्ष मा.मधुकरराव सोनवणे, सेक्रेटरी मा.यशवंतराव आभाळे आदी.



## मराठी विभाग




मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कला महोत्सवात सहभागी विद्यार्थिनी व विद्यार्थी.



मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कला महोत्सवात मान्यवर व प्राध्यापक यांचे समवेत सहभागी विद्यार्थिनी व विद्यार्थी.




निर्भय कन्या अभियानांतर्गत आयोजित कार्यक्रमात उपस्थित महिला प्राध्यापिका.

# राष्ट्रीय छात्र सेना



महाप्रदुषण जागरुकता अभियानांतर्गत राष्ट्रीय छात्र सेना छात्र सैनिकांना स्वच्छ भारत व प्रदुषण मुक्ततेची शपथ देताना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.जे.डी.आंबरे पाटील, सचिव श्री.यशवंत आभाळे, मा.प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ.संजय ताकटे, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी.



कारगिल विजय दिनानिमित्त मा.पॅरा कमांडो श्री.लक्ष्मण पुंजाजी ढोले व प्रमुख पाहुणे महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करताना. सोबत लेफ्ट सचिन पाळंदे, सर्व राष्ट्रीय छात्रसेना छात्रसैनक.



स्वच्छ भारत अभियानांतर्गत राष्ट्रीय छात्रसेनेच्या स्वच्छ भारत जनजागृती अभियान रॅलीला हिरवा झेंडा दाखवताना मा. प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ.एस.बी.शिंदे, मेजर बी.आर. शिंदे, सोबत लेफ्ट सचिन पाळंदे, महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी.अहमदनगरचे गंगासिंग सुभेदार व सर्व राष्ट्रीय छात्रसेना छात्रसैनक.

## राष्ट्रीय छात्र सेना



प्रजासत्ताक दिना निमित्त ध्वजारोहन करताना संस्थेचे अध्यक्ष मा. जे.डी.आंबरे पाटील.
प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भास्कर शेळके तसेच सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी.




राष्ट्रीय छात्र सेना दिवस संविधान दिनानिमित्त आदिवासी एकता मुक बधिर विद्यालय, अकोले
येथे शालेय साहित्याचे व फराळाचे वाटप करताना कॉर्पोरल कु.कुमकर आश्लेषा व
मुकबधीर विद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी.

## हिंदी दिवस समारोह



हिंदी दिवस समारोह प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्व सांगताना प्रमुख अतिथी गझलकार डॉ.कमर सरुर.




हिंदी दिवस समारोह प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री.मधुकरराव सोनवणे. व्यासपिठावर प्रमुख अतिथी गझलकार डॉ.कमर सरुर, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, प्रा.डॉ.साहेबराव गायकवाड, प्रा.जी.बी.इदे आदी.




हिंदी दिवस समारोह प्रसंगी प्रमुख अतिथी गझलकार डॉ.कमर सरुर यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.भास्कर शेळके. समवेत अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री.मधुकरराव सोनवणे, प्रा.डॉ.साहेबराव गायकवाड, डॉ.यासिन सय्यद, प्रा.जी.बी.इदे आदी.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती



छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त अभिवादन करताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.आ.वैभवराव पिचड.
समवेत संस्थेचे अध्यक्ष मा.जे.डी.आंबरे पाटील, सर्व पदाधिकारी, प्राचार्य व प्राध्यापक.



छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विविध कला सादर करताना महाविद्यालयीन विद्यार्थी.



छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
संस्थेचे कायम विश्वस्त मा.आ.वैभवराव पिचड. व्यासपिठावर उपस्थित मान्यवर.

## वार्षिक स्नेहसंमेलन



४६ वे वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री मा.शरदराव काळे.



सन २०१९-२० या वर्षीचा 'स्टुडन्ट ऑफ द इअर' पुरस्कार स्विकारताना तृतीय वर्ष कला वर्गाचा विद्यार्थी अमोल मच्छिंद्र आरोटे.

महाविद्यालयाचे ४६ वे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री मा.श्री.शरदराव काळे यांचा सत्कार करताना संस्थेचे कार्यकारी विश्वस्त माजी मंत्री मा.मधुकरराव पिचड साहेब.समवेत संस्थेचे कायम विश्वस्त मा.सिताराम पा.गायकर.



## वार्षिक स्नेहसंमेलन



४६ वे वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी समुह नृत्य सादर करताना विद्यार्थी.



४६ वे वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी महाविद्यालयाचे नियतकालिक 'अगस्त्य' चे प्रकाशन करताना प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री मा.शरदराव काळे, संस्थेचे कार्यकारी विश्वस्त माजी मंत्री मा.मधुकरराव पिचड, अध्यक्ष मा.जे.डी.आंबरे पाटील, सहसेक्रेटरी ॲड.भाऊसाहेब गोडसे व इतर मान्यवर.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र कार्यालयाचे उद्‌घाटन करताना अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त माजी मंत्री मा.मधुकरावजी पिचड साहेब. समवेत शास्त्रज्ञ पद्मश्री शरदराव काळे, संस्थेचे कायम विश्वस्त सिताराम पा.गायकर,अध्यक्ष जे.डी.आंबरे पाटील, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, संयोजक : प्रा.डी.डी.शेटे.



## पदवीग्रहण समारंभ




महाविद्यालयाच्या पदवीग्रहण समारंभप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ.रावसाहेब कसबे.
व्यासपीठावर उपस्थित अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री.जे.डी.आंबरे पाटील,
प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ.संजय ताकटे, परीक्षा विभाग प्रमुख डॉ.किरण जाधव आदी.



महाविद्यालयाच्या पदवीग्रहण समारंभ प्रसंगी ज्येष्ठ विचारवंत डॉ.रावसाहेब कसबे.
यांचेसमवेत पदवी ग्रहण केलेले विद्यार्थी.

# पदवीग्रहण समारंभ



महाविद्यालयाच्या पदवीग्रहण समारंभप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ.रावसाहेब कसबे व मान्यवरांच्या हस्ते पदवी ग्रहण करताना विद्यार्थी.




महाविद्यालयाच्या पदवीग्रहण समारंभप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत डॉ.रावसाहेब कसबे यांचेहस्ते मुलगी कु.सात्विका शिंदे हीचे प्रमाणपत्र स्विकारताना उपप्राचार्य डॉ.सुनिल शिंदे.

# मराठी विभाग

विभागीय संपादक

**प्रा.डॉ.सुनील घनकुटे**
**प्रा.सुधीर राक्षे**

# अनुक्रमणिका

## मराठी विभाग


| अ.क्र | विषयाचे नाव | लेखकाचे नाव/कवी | वर्ग / पद | पृ.क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | पूर परिस्थिती | प्रा.सौ.पुंडे सोनाली सयाजी | सहा.प्राध्यापक | ११ |
| २ | चंद्रयान | कु.शिर्के गायत्री भाऊसाहेब | एम.कॉम. | १२ |
| ३ | कलम ३७० म्हणजे काय? | कु.वाकचौरे श्रध्दा संजय | एम.कॉम. | १५ |
| ४ | सांगली, सातारा, कोल्हापूरातील पूर | कु.गिरी आदिनाथ विजय | एम.एस्सी. | १८ |
| ५ | पर्यावरण संतुलनाची आवश्यकता | श्रीमती सहाणे अनिता दगडू | क.लघुलेखक | २० |
| ६ | जागतिक महामंदी | कु.पूजा संतोष धुमाळ | टी.वाय.बी.कॉम. | २१ |
| ७ | चंद्रयान | कु.आकांक्षा नवनाथ पन्हाळे | टी.वाय.बी.कॉम. | २३ |
| ८ | दुष्काळाने भिजलेल्या (कविता) | कु.पूजा अनिल गोर्डे | एस.वाय.बी.कॉम. | २४ |
| ९ | सुंदर आयुष्य (कविता) | कु.अर्पिता संजय गजे | टी.वाय.बी.कॉम. | २५ |
| १० | महापूराचा प्रकोप (कविता) | कु.गोर्डे अस्मिता मधुकर | एफ.वाय.बी.सी.एस. | २७ |
| ११ | दुष्काळ (कविता) | कु.गोर्डे अस्मिता मधुकर | एफ.वाय.बी.सी.एस. | २८ |
| १२ | फौजी (कविता) | कु.जगधने अश्विता बाळासाहेब | टी.वाय.बी.एस्सी. | २९ |

# पूर परिस्थिती

प्रा.सौ.पुंडे सोनाली सयाजी
सहाय्यक प्राध्यापिका, राज्यशास्त्र विभाग

२००५ नंतर महाराष्ट्रात चौदा वर्षांनी महापूर आला. 'नदीला पूर आलेला, कशी येऊ कशी येऊ' हे गीत श्रवणीय आहे. कोणताही पूर हा बघायला रमणीयच असतो, मात्र तो वेळच्या वेळी ओसरला नाही तर काय होते? ते आज पश्चिम महाराष्ट्र अनुभवत आहे. केवळ पश्चिम महाराष्ट्रच नव्हे तर, विदर्भावरही झालेली वरुण राजाची अवकृपा आठवडाभरानंतरही कायम आहे, महापूराने प्रचंड प्रमाणात हानी झाली.

सातारा, सांगली, कोल्हापूर, कोकण, नाशिक इत्यादी भागातील कृष्णा, कोयना, वारणा, पंचगंगा, गोदावरी या मोठ्या नद्यांसह वेदगंगा, दूधगंगा, येरळा, वेन्हा, भीमा, चंद्रभागा अशा अनेक छोट्या मोठ्या नद्यांतील पाणी त्यांच्या पात्राबाहेर पसरले. ज्या नद्यांनी त्यांच्या काठावरच्या लोकांना आतापर्यंत जगवलं, खाऊ - पिऊ घातले, लेकरासारखे सांभाळले त्याच नद्यांच्या पाण्याने काठावरच्या काही लोकांचे जीव घेतले. काहींची घरे जमीनदोस्त केली, तर काहींचे नगदी पैसे देणारं उभं पीक डोळ्यासमोर घालवले. माणसांची ही तऱ्हा तर जनावरांची त्याहीपेक्षा वाईट अवस्था. पुराच पाणी आल्यानंतर ज्या माणसांनी जनावरांची दावी, कासरे कापून टाकले ती कशीबशी पाण्यातून बाहेर आली. कुठं गेली ते मात्र कळल नाही. काही जगली, काही पुरात वाहून मेली. ज्या जनावरांची दावी, कासरे सोडले वा कापले नाहीत, त्यांना दावणीलाच बुडून मरावं लागलं.

''उदक तारक, उदक मारक
उदक सुख दु:ख दायका
बघता उदकाचे थैमान,
वाटे मानवाचा अविवेक,
अमर्याद आहे।''

एकीकडे आभाळ फाटल्यागत पडणारा पाऊस आणि त्याचवेळी सरकारने दाखवलेला हलगर्जीपणा याचा फटका कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील काही लाख लोकांना बसला आहे. आठवडाभरापूर्वी वरुणराजाने आपली कृपादृष्टी तहानलेल्या महाराष्ट्राकडे वळवली, तेव्हा पहिले दोन दिवस नदी - नाल्यांना आलेले पाणी सुखद वाटत होते, किंवा पंचगंगा कोल्हापुरात घुसली असे झालेले नसून, सांगलीकर कृष्णेच्या पात्रात तर कोल्हापूरकर पंचगंगेच्या पात्रात अनेक वर्ष घुसत आहेत. मुंबईत समुद्रमागे हटवून अतिक्रमण होत असेल तर आम्ही नदीपात्रात, ओढ्यात, नाल्यात अतिक्रमण का करु नये ही आमची मानसिकता आहे.

पुराच्या विळख्यात अडकलेल्या लोकांच्या सुटकेसाठी लष्कर 'एनडीआरएफ' बरोबरच स्थानिक तरुण हिरिरीने पुढे आले. पूरग्रस्तांना सुरक्षित स्थळी पोहचविताना त्यांच्या खाण्यापिण्याची व अन्य सोय करुन या तरुणांनी मदतकार्यात घेतलेल्या आघाडीला दाद द्यायलाच हवी. पूर ओसरल्यानंतर जी काही साफसफाई करावी लागेल; मग ती निसर्गावर आपण आजवर केलेल्या अत्याचाराची असो की, राजकीय, प्रशासकीय, हलगर्जीपणाची असो, ती नंतर करता येईल. आज खरी गरज आहे, ती पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्यांची सुखरूप सुटका करण्याची, त्यासाठी विविध सरकारी यंत्रणांनी कमालीने काम करायला लागेल. पश्चिम घाट हा जैव विविधतेने नटलेला घाट आहे. मानवाने डोंगरदऱ्या आणि वृक्ष यांच्यावर अत्याचार केले आणि त्यामुळे निसर्गाचे चक्रच बदलून गेले आहे.

या महापूराचा विचार केला असता, प्रत्यक्ष परीक्षेत मात्र सरकार मग ते कोणत्याही पक्षाचे असो, नापासच होत आले आहे. पूरात अडकून पडलेल्यांची सुटका आणि त्यांचे नंतरचे पुनर्वसन असे दुहेरी आव्हान आहे. संकट महाप्रचंड आहे, त्याला केवळ सरकार पुरे पडणार नाही, त्यासाठी शासनाबरोबर सर्वांनाही मदतीचा हात पुढे करावा लागणार आहे.

# चंद्रयान – २

## कु.शिर्के गायत्री भाऊसाहेब
एम.कॉम.

भारतीय अवकाश संशोधन संस्था 'इस्त्रो' ने आपल्या चंद्रावरील दुसऱ्या मोहिमेचे म्हणजेच 'चांद्रयान – २' चे २२ जुलै २०१९ रोजी दुपारी २ वाजून १ मिनीटांनी सतिश धवन, अंतराळ केंद्र, श्रीहरिकोटा येथून यशस्वी प्रक्षेपण केले.

'चंद्रयान – १' च्या यशानंतर चंद्राच्या पुढील टप्प्यातील संशोधनास गती देण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी १८ सप्टेंबर २००८ रोजी 'चंद्रयान – २' या महत्वकांक्षी मोहिमेस मंजुरी दिली होती. त्यानुसार 'चंद्रयान –२' चे प्रक्षेपण नियोजन करण्यात आले. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे ते ऑक्टोबर २०१८, ३ जानेवारी २०१९, ३१ जानेवारी २०१९ आणि १५ जुलै २०१९ असे एकूण चार वेळा पुढे ढकलण्यात आले. 'मानवी ज्ञानाच्या सीमा वाढवणे' या 'चंद्रयान २' मोहिमेच्या घोष वाक्यासह भारताला आणि संपूर्ण मानवजातीला फायदे व्हावेत, म्हणून चंद्राच्या बाबतीत आपले संपूर्ण ज्ञान विस्तारणे हे या मोहिमेचे ध्येय आहे.

'चंद्रयान २' मोहिमेसाठी GSLV MK III या प्रकारच्या भारताच्या सर्वात प्रगत प्रक्षेपक वाहनाचा वापर केला गेला. या मोहिमेसाठी या प्रक्षेपण अग्निबाणास GSLV MK III M-I असे नाव देण्यात आले. ४८ दिवसांच्या प्रवासानंतर 'चंद्रयान – २' हे ७ सप्टेंबर २०१९ रोजी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर अलगद उतरणे अपेक्षित आहे. या मोहिमेतील यानामध्ये एक ऑर्बिटर, एक लँडर आणि रोव्हर यांचा समावेश आहे. यामध्ये एकूण १४ उपकरणे (पेलोड) वापरण्यात आली असून, एक पेलोड हे भारताचे तर एक पेलोड 'नासा' या अमेरिकेच्या अंतराळ संस्थेचे आहे. याविषयी माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे पाहूयात.

**उर्जा निर्मिती क्षमता : १००० वॅटस्**

'चंद्रयान – २' प्रक्षेपणाच्या वेळी या ऑर्बिटमध्ये इस्त्रोच्या कर्नाटक मधील 'ब्यालालू' या ठिकाणावरील 'इंडियन डीप स्पेस नेटवर्क' (IDSN) आणि 'विक्रम' या लँडरशी संपर्क ठेवण्याची क्षमता आहे.

**ऑर्बिटरचा मोहिम कार्यकाळ : १ वर्ष**

हे ऑर्बिटर चंद्राच्या पोलर ऑर्बिटमध्ये 100x100 Km मध्ये स्थित असेल.

यावर सर्वाधिक म्हणजे एकूण ८ उपकरणे (पेलोड) लावली गेली आहेत.

**पेलोड ८ उपकरणे :-**

टेरेन मॅपिन कॅमेरा – २ (Terrain Mapping Camera 2 – TMC-2) हे उपकरण चांद्रयान –१ वर बसविण्यात आलेल्या 'टेरेन मॅपिंग कॅमेरा' या उपकरणाचेच छोटे रुप आहे. टीएमसी–२ च्या साहाय्याने चंद्राच्या जमिनीचे छायाचित्रण करण्यात येईल. हे उपकरण चंद्राचे त्रिमितीय नकाशा तयार करण्याचे कार्य करेल.

'चंद्रयान –२' लार्ज एरिया सॉफ्ट एक्स–रे स्पेक्टोमीटर (Chandrayan-2 Large, Area soft x-ray spectrometer – Class) हे उपकरण क्ष किरण फ्लुरोन्सेस तंत्राच्या साहाय्याने चंद्रावरील मॅग्नेशिअम, ॲल्युमिनीअम, सिलिकॉन, कॅल्शियम, टिटॅनिअम, लोह व सोडिअम अशा प्रमुख मुलद्रव्यांची उपस्थिती तपासेल. (XRF) हे तंत्रज्ञान अशा मुलद्रव्यांनी उत्सर्जित केलेले क्ष किरण जेव्हा सूर्यकिरणांमुळे होते.

**स्थापना : १५ ऑगस्ट १९६९**

**मुख्यालय : बंगळुरू**

**उद्देश :**

अवकाश तंत्रज्ञानाचा विकास करून त्याचा उपयोग विविध राष्ट्रीय कार्यात करणे, तसेच मानवाचे आणि समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करणे.

**सध्याचे अध्यक्ष : के. सिवन**

**आतापर्यंतची कामगिरी :**

१)१०५ अवकाशयान मिशन एक लाख उपग्रह आणि १ सूक्ष्म उपग्रहासहीत, यशस्वी.

२)आतापर्यंत १५ मिशन्सचे प्रक्षेपण केले.

(Scramjet TD आणि U RLV TD)

३) १० विद्यार्थी उपग्रहांचे (Student Satelite) प्रक्षेपण.

४) ३२ देशातील २६९ परकीय उपग्रहांचे प्रक्षेपण.

**माजी अध्यक्ष :-**

डॉ.विक्रम साराभाई (१९६१ ते १९७१)

पहिले अध्यक्ष, विविध केंद्रांची स्थापना आणि काही अग्निबाणांचे प्रक्षेपण.

एम.जी.के. मेमन : -

१९७२ मध्ये काही कालावधीसाठी.

डॉ.सतीश धवन (१९७२-१९८४)

उपग्रह आणि एसएलव्ही ३ च्या पहिल्या सेटची सुरुवात.

**मानवाच्या चंद्र स्पर्शास ५० वर्षे पूर्ण :-**

मानवाने चंद्रावर पहिले पाऊल ठेवल्याच्या घटनेला २० जुलै २०१९ रोजी ५० वर्ष (सुवर्ण महोत्सव) पूर्ण झाली. अमेरिकेच्या अपोलो ११ या चंद्रयान मोहिमेंतर्गत 'नील आर्मस्ट्राँग' यांनी २० जुलै १९६९ रोजी चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. त्यामुळे ते चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारे जगातील पहिली व्यक्त ठरले होते. ज्यावेळी त्यांनी आपले पहिले पाऊल ठेवले, त्यावेळीच त्यांचे असे उद्गार होते. ''माणसाचे एक छोटे पाऊल.. पण मानव जातीची एक प्रचंड झेप.'' त्यांनी आपला हा प्रवास 'फर्स्ट मॅन: द लाईफ ऑफ नील आर्मस्ट्राँग' या चरित्राद्वारे मांडला. त्यांच्या या चरित्राचे लेखक जेम्स हॅन्सेन हे आहेत.

**चंद्रयान २ : मोहिमेची वैशिष्ट्ये :-**

दक्षिण ध्रुवावरील पहिली मोहिम :-

चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर 'चंद्रयान - २'चे अलगद अवतरण करणारा भारत जगातील पहिला देश ठरणार आहे. यापुर्वी अमेरिका, रशिया आणि चीन या देशांनी चंद्राच्या उत्तर ध्रुवावर किंवा विषुवृत्त या ठिकाणी आपल्या मोहिमा पूर्णत्वास नेल्या आहेत.

**स्वदेशी तंत्रज्ञान** : चंद्रयान २ हे पूर्णत: भारतीय बनावटीचे यान आहे. हे यान चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीपणे उतरवणारा भारत हा जगातील चौथा देश ठरणार आहे. ज्याने चंद्रावर अलगद अवतरण केले आहे. यापुर्वी अशी कामगिरी अमेरिका, रशिया आणि चीन यांनी केली आहे.

**अंतर** : चंद्रयान-२ हे यान ३,८४,४०० किमीचा प्रवास करुन चंद्राच्या पृष्ठभागावर उतरणार आहे.

**महिलांकडे नेतृत्व :**

चंद्रयान -२ मोहिमेचे नेतृत्व 'मुथप्पा वनिता' आणि 'रितु करिघाल' यांनी केले. त्यांच्याविषयी थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे.

**मुथप्पा वनिता :**

चंद्रयान -२ च्या प्रकल्प संचालिका इस्त्रोमध्ये त्या ३२ वर्षापासून वैज्ञानिक म्हणून कार्यरत होते.

त्यांनी डिझाईन इंजिनिअरींगचे शिक्षण घेतले असून अनेक वर्षांपासून कृत्रिम उपग्रहांबाबतचे संशोधन करत आहेत.

त्यांनी नोव्हेंबर २०१३ मधील मंगळयान मोहिमेमध्येही महत्वाची भूमिका पार पाडली होती.

**रितु करिघाल :-**

चंद्रयान २ या मोहिमेच्या संचालिका.

त्यांनी मंगळ मोहिमेमध्ये या मोहिमेचे उपसंचालक म्हणून कार्य केले होते.त्यांना रॉकेट वुमन ऑफ इंडिया असे म्हटले जाते.

त्यांना इस्त्रोच्या युवा वैज्ञानिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**चंद्रयान २ मोहिमेचा खर्च :**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने या प्रकल्पासाठी ९७८ कोटी रुपये खर्च केले.

**चंद्राचा अभ्यास कशासाठी :**

चंद्र हा पृथ्वीच्या जवळ असलेला नैसर्गिक उपग्रह आहे. खोलवरच्या अंतराळ संशोधन मोहिमांसाठीच्या तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक करण्यासाठी चंद्र हे एक खात्रीशीर चाचणी मैदान आहे.

**चंद्र :**

१.चंद्र हा सूर्यमालेतील पाचवा मोठा नैसर्गिक उपग्रह आहे.

२.पृथ्वी आणि चंद्रामधील अंतर ३८४४०३ किमी एवढे आहे.

३.चंद्राचा व्यास पृथ्वीच्या व्यासाच्या (१२७२१२ किमी) एक चतुर्थांशाहून थोडासा अधिक म्हणजे ३.४७४ किमी आहे.

४.चंद्राचे वस्तुमान हे पृथ्वीच्या सुमारे २ टक्के आहे व चंद्राची गुरुत्वाकर्षण शक्ती ही पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीच्या तुलनेत सुमारे १७ टक्के इतकी आहे.

**नील चंद्र :-**

जेव्हा एका इंग्रजी महिन्यात दोन पौर्णिमा येतात तेव्हा दुसऱ्या पौर्णिमेच्या चंद्राला नीलचंद्र (मन्थली ब्ल्यू मून) असे म्हणतात असा नीलचंद्र ३१ मार्च २०१८ रोजी होता आणि त्यानंतर ३१ ऑक्टोबर २०२० रोजी असेल.

**सुपर मून : -**

चंद्र पृथ्वीभोवती लंब वर्तुळाकार मार्गाने भ्रमण करीत असल्याने तो कधी पृथ्वीच्या जवळ येतो, तर कधी पृथ्वीपासून दूर जातो. जेव्हा चंद्र पृथ्वीजवळ येतो, तेव्हा तो नेहमीपेक्षा मोठा व तेजस्वी दिसतो. या चंद्रास 'सुपर मून' म्हणतात.

**सेलेनोग्राफी :-**

चंद्राच्या भौतिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजेच सेलेनोग्राफी होय.

**भारताची अवकाश संशोधन क्षेत्रातील प्रगती :**

१)विक्रम साराभाई अणि भौतिक शास्त्रज्ञ कलपाटी रामकृष्णन रामनाथन यांच्या नेतृत्वाखाली १६ फेब्रुवारी १९६२ रोजी अवकाश संशोधन राष्ट्रीय समितीची स्थापना झाली.

२)२१ नोव्हेंबर १९६९ रोजी केरळ येथील धुंबा विषुवृत्तीय प्रक्षेपण केंद्रावरुन पहिल्या संशोधन रॉकेटच्या प्रक्षेपणाने भारतीय अवकाश कार्यक्रमाची सुरुवात झाली.

३)१५ ऑगस्ट १९६९ रोजी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची (इस्त्रो) स्थापना झाली.

४)१० एप्रिल १९८२ रोजी इन्सॅट आय.ए. उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यात आले.

५)अवकाशात प्रवेश करणारा प्रथम भारतीय ठरण्याचा मान राकेश शर्मा (२ एप्रिल १९८४) यांच्याकडे जातो. या मोहिमेत सोयुझ-टी-११ या अवकाशयानाचा वापर करण्यात आला.

६) चंद्रयान १ चे यशस्वी प्रक्षेपण २२ ऑक्टोबर २००३ रोजी करण्यात आले.

७) मंगळयानाचे प्रक्षेपण ५ नोव्हेंबर २०१३ रोजी करण्यात आले.

**मुल्यांकन : -**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्त्रो) २२ जुलै २०१९ रोजी 'चंद्रयान २' चे यशस्वीरीत्या अवकाशात प्रक्षेपण केले. चंद्रयान - २ चे मध्ये समाविष्ट प्रग्यान रोव्हर ७ सप्टेंबर २०१९ रोजी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील मोहिम यशस्वी करणारा जगातील पहिला देश ठरणार आहे.

विज्ञानाचा विकास होणे ही काळाची गरज आहे आणि त्यासाठीच स्वातंत्र्योत्तर भारतात विज्ञान - तंत्रज्ञान विकासाकडे विविध सरकारांने लक्ष दिल्याचे दिसते आणि चंद्रयान २ च्या यशस्वी प्रक्षेपणाने त्याची प्रचिती आपल्याला देत आहे.



# कलम ३७० म्हणजे काय

## कु.वाकचौरे श्रध्दा संजय
एम.कॉम.

भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अनुमोदनाने गृहमंत्री अमित शहा यांनी ५ ऑगस्ट २०१९ रोजी भारताच्या राज्यघटनेतून कलम ३७० काढून टाकण्याचा प्रस्ताव राज्यसभेत मांडला. दोन्ही सदनामधून बहुमताने या कलमाचे उच्चाटन व्हावे यावर बहुमताने शिक्कामोर्तब झाले. या अगोदर काश्मीरला स्वत:ची राज्यघटना, स्वत:चा वेगळा झेंडा, स्वत:चे प्रधानमंत्री आणि त्याच्या संमतीने राज्यपालाच्या ऐवजी सदर 'इ-रिसायत' हे पद नेमण्याचा अधिकार आणि वेगळे नागरिकत्व मिळालेले होते. १४ मे १९५४ रोजी तात्कालिन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी शेख अब्दुल्ला यांच्याशी संगनमत करुन, राष्ट्रपतींचा आदेश मिळवला आणि कलम ३७० म्हणून तो लागू करण्यात आला. वास्तविक या कलमाच्या स्वीकार्यतेबद्दल शंका असल्यामुळे, कुठल्याही सदनात याची चर्चा घडवली गेली नव्हती, कलम ३७० आणि त्याला जोडलेल्या कलम ३५ अ अन्वये काश्मीरमध्ये कोणत्याही भारतीयाला जमीन व घर विकत घेता येत नसे, उदयोगधंदा सुरु करता येत नसे. काश्मिरी मुलीने काश्मीरबाहेरच्या मुलाशी लग्न केले तर तिच्या मुलांना वडिलोपार्जित संपत्तीत कुठलाही वाटा मिळत नसे. ३५-अ अन्वये जम्मू-कश्मीरचा रहिवासी नसलेला त्या राज्याच्या विदयापीठात शिकू शकत नसे. त्याला कोणतीही सरकारी शिष्यवृत्ती मिळत नसे, किंवा कोणत्याही सरकारी कल्याणकारी योजनेचा फायदा घेता येत नसे. भारतीय संसदेने पास केलेले कोणतेही कायदे जम्मू-काश्मीरला लागू होत नसत.

भारताचे सविधान संपादन करा (भाग २१ - अस्थायी,संक्रमणकालीन व विशेष तरतूदी)

कलम ३७० : जम्मू व काश्मिर राज्याबाबत अस्थायी तरतूद

१) या संविधानात काहीही असले तरी

क) अनुच्छेद २३८ च्या तरतुदी जम्मू व काश्मिर राज्याच्या संबंधात लागू असणार नाहीत.

ख) उक्त राज्याकरीता कायदे करण्याच्या भारतीय संसदेचा अधिकार पुढील बाब.

भारतीय राज्य घटनेच्या कलम ३७० नुसार जम्मू काश्मिरला सार्वभौम राज्य म्हणून दर्जा देण्यात आला आहे. १९४७ मध्ये भारताच्या फाळणीनंतर जम्मू काश्मिरचे राजा हरिसिंग यांना स्वतंत्र राहण्याची मंजूरी दिली. जम्मू काश्मिरमध्ये पहिले हंगामी सरकार स्थापन केल्यावर, नॅशनल कॉन्फरन्सचे नेते शेख अब्दुल्ला यांनी भारतीय संविधानाच्या बाहेर राहण्याची शिफारस केली.

भारतीय राज्य घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा या कलमाला विरोध होता.

डॉ.पी.जी.ज्योतीकर त्यांच्या व्हिजनरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर या पुस्तकात त्यांनी केलेल्या विरोधाचा उल्लेख आहे. नंतर या कलमाचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी नेहरुंनी गोपालस्वामी अय्यंगार यांच्यावर सोपवली. १९५१ मध्ये एक वेगळी घटना तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. काश्मिरला असलेला विशेष राज्याचा दर्जा सुरुवातीला तात्पुरत्या स्वरुपाचा होता. मात्र अजुनही हा दर्जा कायम होता. हा दर्जा काढून घेण्याची मागणी वाऱ्यावर झाली होती. काश्मिरमध्ये काही मोठी समस्या उदभवली की हा मुद्दा कायम चर्चेत येत असतो.

शेख अब्दुल्ला यांच्या संदिग्ध भूमिकेमुळे तसेच प्रधानमंत्री नेहरु संयुक्त राष्ट्रामध्ये गेले असल्यामुळे, या कलमाची आणि काश्मिर भारतात यावे, यासाठी काय पावले उचलावी असा पेच निर्माण झाला होता. अशावेळी सरदार पटेल यांनी 'इन्स्ट्रूमेंट ऑफ ॲक्सेशन' या अर्थात सामील नामा ही संकल्पना मांडली. (अन्य संस्थांबाबत विलीननामा ही संकल्पना आहे.) आणि या पेचातून यशस्वी तोडगा काढला. काश्मिरी जनतेचे काही अधिकार अबाधित

ठेवत तसेच त्यांच्या सार्वमताची हमी देत काश्मिर भारतात सामील झाले.

सदर कलमाच्या 'अधिकार क्षेत्रात' वेळोवेळी बदल झाले. मात्र भारतीय संविधानातील नागरीकत्व मुलभूत हक्क, राज्यातील उच्च न्यायालयाची कार्यकक्षा, निवडणूक प्रक्रिया आदी बाबी काही अपवादात्मक तरतुदीद्वारे या राज्यास लागू होतात. राष्ट्रपती संसद यांचे अधिकार, निवडणूक आयोगाची कार्यपध्दती. महालेखापालांचे कार्यक्षेत्र (कॅग) सर्वोच्च न्यायालयाची अधिकार व्याप्ती या बाबी भारताच्या मूळ राज्य घटनेत 'जशा आहेत तशा' स्थितीत काश्मिरलाही लागू होतात.

मात्र राज्य लोकसेवा राज्यांतर्गत आणीबाणी लागू करणे, राज्याच्या सीमांमध्ये बदल करणे, राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्व, असे राज्य घटनेमधील मुद्दे काश्मिरला जसेच्या तसे लागू होत नाही. म्हणजे नेमके काय? तर अशा मुद्यांचा अवलंब करण्यापूर्वी काश्मिरच्या राज्य विधानसभेची सहमती घेणे अनिवार्य होते.

**काश्मिरमधून ३७० कलम हद्दपार :**

जम्मू आणि काश्मिर राज्याच्या विशेष दर्जाचा आधार असलेला अनुच्छेद ३७० रद्द करण्याचे ऐतिहासिक विधेयक राज्यसभेनंतर लोकसभेत ३५१ विरुध्द ७२ मतांनी मंजूर करण्यात आले. यावेळी जम्मू काश्मिरच्या विभाजनाचं विधेयकही ३६६ विरुध्द ६६ मतांनी मंजूर करण्यात आलं.

अनुच्छेद ३७० रद्द करण्याचा तसेच ३७० नुसार केलेल्या सर्व अन्य दुरुस्त्या गैरलागू करण्याच्या शिफारशीचा प्रस्ताव राज्यसभेत विधेयक मांडले गेले होते, मात्र त्या आधीच राष्ट्रपतींनी अधिसूचना काढली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत विधेयक मांडत अनुच्छेद ३७० रद्द करत असल्याची माहिती दिली होती. राज्यसभेत विधेयक मंजूर झाल्यावर ते लोकसभेत मांडण्यात आले. यावेळी मोठ्या फरकाने ते लोकसभेतही मंजूर झाले आणि काश्मिरमधून ३७० कलम हद्दपार झाले.

राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी अधिसूचना जारी करीत 'अनुच्छेद ३७०' रद्द केले. अनुच्छेद ३७० पूर्णत: संपुष्टात आणलेले नाही. त्यातील उपकलम कायम असून, त्याद्वारे या अनुच्छेदातील अन्य सर्व विशेष लाभ राष्ट्रपतींनी विशेषाधिकारानूसार रद्द करण्यात केले आहेत. अनुच्छेद ३७० रद्द झाल्याने याच अनुच्छेदाचा आधार घेऊन १९५४ मध्ये लागू केलेला अनुच्छेद ३५ अ देखील आता घटनाबाह्य ठरला. त्यामुळे राज्याबाहेरील नागरिकांना जम्मू काश्मिरमध्ये मालमत्ता खरेदी करता येणार आहे. आर्थिक दूर्बलांसाठी लागू असणारे १० टक्के आरक्षणही आपोआप लागू होईल.

अनुच्छेद रद्द करण्याच्या प्रस्तावाबरोबरच जम्मू काश्मिरचे विभाजन आणि हा संपूर्ण भूप्रदेश केंद्रशासित करणारे विधेयकही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मांडले. हे विधेयक १२५ विरुध्द ६१ मतांनी संमत करण्यात आले. जम्मू काश्मिर तसेच लडाखला १० टक्के आर्थिक आरक्षण लागू करणारे विधेयकही आवाजी मतदानाने संमत करण्यात आले होते.

**काश्मिर कलम ३७०**
**हटवल्यानंतर हे होईल :-**

केंद्र सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत जम्मू आणि काश्मिरला देण्यात आलेल्या घटनात्मक स्वतंत्र दर्जा देणारे कलम ३७०, हटवण्याची शिफारस करणारे दुरुस्ती विधेयक राज्यसभेत सादर केले. ही कलमे हटविण्यात आल्यानंतर या निर्णयांचे देशाच्या दृष्टीने काय फायदा होऊ शकेल हे पाहणे महत्वाचे आहे.

१)राज्यातील वेगळी राज्य घटना संपुष्टात येईल.

२)काश्मिरचा स्वतंत्र झेंडाही रद्द होणार आहे. अर्थात जम्मू काश्मिरमध्ये तिरंगा फडकवला जाईल.

३)काश्मिरमधील लोकांचे दुहेरी नागरिकत्व संपुष्टात येणार आहे.

४)कलम ३७० नुसार जम्मू काश्मिरमधील निवडणूकीत केवळ त्याच राज्यातील नागरिकांना मतदानाचा अधिकार होता.

५)जम्मू - काश्मिर हा विधानसभा असणारा केंद्र शासित प्रदेश असेल.

६)भारतीय संसद यापुढे काश्मिरसाठीही सर्वोच्च असेल. भाराताची राज्य घटना या प्रदेशाला पूर्णपणे लागू होईल, यानंतर जम्मू काश्मिरची वेगळी राज्य घटना नसेल.

७)जम्मू काश्मिरमध्ये माहितीचा अधिकार कायदा, सीजीए लागू होणार.

८)भारतीयांना काश्मिरमधील संपत्ती खरेदी करण्याचा आणि काश्मिरमध्ये गुंतवणूक करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

९)कोणताही भारतीय नागरिक जम्मू काश्मिरमध्ये नोकरी करु शकतो.

कलम ३७० हटवण्याच्या निर्णयामुळे होणारे बदल :-

१.जम्मू काश्मिरला स्वायत्त राज्याचा दर्जा राहणार नसल्याने दुहेरी नागरिकत्वाचा विषय संपुष्टात येईल.

२.जम्मू काश्मिरबाबत कुठलाही नवा कायदा करण्यासाठी आता राज्य सरकारची संमंतीची गरज असेल.

३.राज्य सरकारच्या कायद्यात केंद्र सरकार हस्तक्षेप करु शकेल.

४.देशातील अन्य राज्यातील नागरिकांना आता जम्मू काश्मिरमध्ये संपत्ती खरेदी करता येईल, गुंतवणूक करता येईल.

५.जम्मू काश्मिर पोलिस केंद्र सरकारच्या केंद्रीय गृहखात्याच्या अखत्यारीत येतील.

६.राज्यावर आर्थिक आणिबाणी लागू करण्याचा अधिकार मिळेल.



# सांगली, सातारा, कोल्हापूरातील महापूर

कु.गिरी आदिनाथ विजय
एम.एस्सी., द्वितीय वर्ष

प्रलयाचं रुप किती भीषण असतं, याचा अनुभव महाराष्ट्र आणि कर्नाटकाला पुन्हा एकदा आला. कृष्णा खोऱ्यात नद्यांना आलेल्या महापुरामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि बेळगाव, कारवार परिसरात अनेक ठिकाणी ५ ऑगस्टपासून जनजीवन विस्कळीत आहे. कोल्हापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यातले अनेक भाग सहा – सात दिवस पाण्याखाली गेला होते.

सह्याद्री पर्वतरांगेत, विशेषतः कृष्णा खोऱ्यात नद्या उगम पावतात, महाबळेश्वर परिसरात पावसानं यावर्षी अनेक रेकॉर्डस मोडले आहेत, वारणा खोऱ्यातही यावर्षी ६५०० मिमी पाऊस झाला. इतक्या अतिवृष्टीमुळे साहजिकच या परिसरातल्या नद्यांना पूर आले आणि त्या एच.एफ.एल. च्या वर चढल्या. पंचगंगा नदीने घेतलेलं रौद्र रुप आणि त्यात सापडलेल्या कोल्हापूरातील चिखली आणि आंबेवाडीतील पूरस्थिती व त्यात घडलेला एक प्रसंग.

नजर जाईल तिकडे लाल भडक गढूळ पाणी, सणकून येणाऱ्या पावसाच्या सरीसोबत वाढणारी पाणीपातळी, प्रवाहात बुडालेल्या झाडांच्या काही फांद्या, निम्मी बुडालेली दोन व तीन मजली घरे आणि त्यामध्ये अडकलेली माणसं, त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारी प्रचंड भितीची छाया. 'बोट येईल आणि आपल्याला सुरक्षित स्थळी घेऊन नेईल' असे चिमुकल्यांना सांगणारी आई. आम्हाला वाचवा असे म्हणत हात जोडून विनवणी करणारी माणसं, लहान मुलांचे केविलवाने चेहरे, वाहत जाणारी मृत जनावरे, एनडीआरएफ सैन्य दलाच्या बोटीकडे लागलेल्या नजरा सुरक्षित बाहेर पडण्याची लागलेली आस, हे सारे चित्र आहे या प्रलयाचे.

सकाळी ७ वाजल्यापासून भारतीय नौसेना, एनडीआरएफच्या बोटी, आंबेवाडी व प्रयाग चिखलीकडे मार्गस्थ होऊ लागल्या. वारा, पाऊस याची तमा न बाळगता सैनिक लागेल ती मदत पुरवत मदतीचा हात देत आहे. पंचगंगेच्या कवेत आलेल्या चिखली आणि आंबेवाडी या दोन्ही गावातील परिस्थिती गंभीर बनली आहे. त्यामुळे महिला व लहान मुले पुलावर येताच परिस्थितीचे गांभीर्य दिसत होते. त्यांचे चेहरे या जीवघेण्या परिस्थितीची साक्ष देत होते. दोन्ही गावात अजूनही 'दोन हजारांवर माणसं घरात अडकून पडलेली आहेत. त्यांना लवकर बाहेर काढा' असे बाहेर आलेल्या प्रत्येक महिला सांगत होत्या. पण निसर्गाला काहीतरी वेगळेच मान्य होते. पावसाचा वेग आणि पाणी पातळी दोन्हीही वेगाने वाढत होत्या. पाण्याच्या वेगवान प्रवाहाने तो पूलही तुटायला लागला होता. हे लक्षात येताच माणसांनी हंबरडा फोडून सैरावैरा पळण्यास सुरुवात केली पण अखेर त्याने धीर सोडलाच. त्या प्रवाहात वाहून जाणारी माणसे, लहान मुले, काळजाला छिद्र पाडणारे दृश्य असं की, आपल्या सहा महिन्यांच्या मुलाला घेऊन पुलाखाली पडणारी ती माय आजही माझ्या नजरेसमोर आली की काळजात धस्स होतं.

परिस्थितीचा आढावा घेतला तर पंचगंगा नदीच्या प्रवाहात जाणाऱ्या बोटी पाण्याच्या जोरदार लाटांनी हेलकावे खात होत्या. वीस ते पंचवीस फूट पाणी ते देखील जोरात वाहणारे, तयार होणाऱ्या लाटा, नजर जाईल तिकडे दिसणारे पाणीच पाणी, धडकी भरेल अशी स्थिती.

प्रवाहाची तीव्रता अधिक असल्याने बोटींचा वेगही कमी होत होता. बोटी आंबेवाडीला जाताच तेथील भयावह दृश्य पाहून जवानही हुरहुरले. शेजारीच तीन मजली इमारत होती. तिसऱ्या मजल्यावर दोन महिला व एक मुलगा सुटका व्हावी म्हणून प्रतीक्षा करत, त्यांच्या शेजारच्या इमारतीवर हेच दृश्य होते. प्रत्येकाला तेथून लवकरात लवकर बाहेर यायचे होते. पुरात अडकलेल्यांची संख्या तीन हजारात होती. एका बोटीत एका फेरीत १० ते १२ माणसेच बसू शकत होती. बोट घराजवळ आली की, 'आम्ही उडी मारुन बसतो, पण आम्हाला आधी बाहेर काढा,' म्हणत प्रत्येकजण हात जोडून विनंती करत होता. महिला आणि लहान मुलांना प्राधान्य देत त्यांना बोटीत घेतले जात होते.

भुकेल्या पोटी सुरू असलेली आर्त विनवणी हृदयाला पिळ घालत होती. लहान मुलांचे कोमजलेले चेहरे, जीव वाचवण्यासाठी धडपडणारी जनावरे, पाण्यापासून सुरक्षित ठिकाणी जाण्याचा प्रयत्न करणारी भटकी कुत्री, प्रवाहात वाहणारी मृत जनावरे, सारेच चित्र भयंकर अंगावर काटा आणणारे. कमी न होणारा पावसाचा मारा, तरीही भिजलेल्या अंगापेक्षा प्रत्येकाला काळजी होती ती पुराच्या वेढ्यातून सुटण्याची.

प्रत्येकाला सुरक्षित स्थळी आणण्यासाठी जवान प्रयत्न करत होते. भर पावसात देखील मोहीम थांबली नव्हती. तीच चिखलीचीही अवस्था अशीच बिकट होती. प्रत्येकाला तातडीने या जीवघेण्या पूरातून बाहेर पडायचे होते. त्यांना जवान धीर देत होते. 'आपको निकालेंगे, फिकर मत करो' असे म्हणत त्यांचे बचाव कार्य अव्याहतपणे सुरु होते.

जोपर्यंत शक्य होते, तोपर्यंत चिखलीत जनावरांची काळजी घेतली पण पूर ओसरणार नाही याची खात्री झाल्यानंतर सर्व जनावरे सोडून दिली. जे जगतील ते आपले असे म्हणत सर्व जण गाव सोडत होते. काही जनावरे वाहून गेली. जीवापाड प्रेम असतानाही या भयंकर स्थितीत जो तो आपले प्राण वाचविण्यासाठी धडपडत होता. तोच एक अविस्मरणीय क्षण पाहावयास मिळाला. बचावकार्यात यशस्वी झालेली ती महिला जवानांच्या पाया पडून त्यांचे आभार व्यक्त करत होती. त्या दिवशी त्या जवानांना दर्जा होता, तो भगवंताचाच.

कोल्हापूर, सांगली आणि साताऱ्यातही परिस्थिती अशीच होती. कोयना नदीने घेतलेली उसळी, राधानगरी धरणाचे दरवाजे पाण्याच्या प्रवाहाने बंदीस्त भिंती तुटतात की काय? ही परिस्थिती काळजाला धस्स करणारी होती.

ते हात पूर परिस्थिती पाहून प्रार्थना करत होते की,
'नको पांडुरंगा मला हे सोन्या चांदीचे दान रे,
फक्त भागव देवा हे तहानलेले दान रे,
कमरेवरचा हात काढून आभाळाला लाव तू,
ढगाला थोडे हलवून भिजव माझा गाव तू।'

तेच हात आज सांगली, सातारा आणि कोल्हापूरातील पुरग्रस्तांकरीता पावसाला पुरे झाले आता असे

म्हणत होती, गरज होती तेव्हा नाही आलास बाबा, मात्र घरदार ओढून नेलास बाबा।

कमाल आहे रे पावसा तुझी आता किती पडणारेस, अजून किती घेणार बळी किती रडवणारेस,

पावसामुळे घरदार गेलं, रानातलं पीक उभं सडलं,आता तुझं बरसणं बंद नाही केलस, तर सगळ महापूरात गंडलं।

एक गोष्ट मात्र तू चांगली केलीस,गरिबांच्या झोपडीतही शिरलास आणि
श्रीमंतांच्या बंगल्यातही शिरलास।
तुझी ही बाब मला पटली,
माणसांप्रमाणे भेदभाव नाही केलास,
बळीराजासाठी तरी तू थांब, नाही तर जगाची
भूक भागवणारा तुटेल खांब,
तुला हात जोडून विनंती,
नको करु मुक्या जनावरांची थट्टा।
आता तरी तू घे रजा,
खूप दिली बा सजा,
शेवटी एकच विनंती आहे,
माणसांच्या चुका घे पदरात,
आणि विलीन होऊन जा आसमंतात,
विलीस होऊन जा आसमंतात.

स्वत:ची तुलना इतरांबरोबर करु नका.
तसे केल्यास तुम्ही स्वत:चा
अपमान करत आहात.

–ॲडॉल्फ हिटलर

# पर्यावरण संतुलनाची आवश्यकता

**श्रीमती सहाणे अनिता दगडू**
कनिष्ठ लघुलेखक

५ जून हा 'जागतिक पर्यावरण दिवस' म्हणून साजरा केला जातो. पर्यावरण म्हणजे पृथ्वीभोवतालच्या वातावरणाचा समतोल होय. हा समतोल राखण्यासाठी आम्हाला वृक्ष खूपच मदत करतात. त्यामुळे भारतीय संस्कृतीमधील वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या वृक्षांची, प्राण्यांची पुजा करण्याची परंपरा खूप दुरदृष्टीची म्हणावी लागेल, जंगलात पक्षी व प्राणी हे जीव झाडांच्या आश्रयाने राहतात. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या जयंतीनिमित्ताने पर्यावरण संरक्षणाच्या हेतूने विविध उपक्रम महाविद्यालये, विद्यापीठे तसेच विविध सार्वजनिक ठिकाणी राबवले जातात.

गांधीजी म्हणायचे की, 'भारताचे ह्रदय खेड्यापाड्यात आहे. खेड्यांचा विकास महत्वाचा आहे.' आजही भारतातील ६० टक्के लोकांचा रोजगार कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे आपल्या गावांच्या विकासाकडे सातत्याने लक्ष देणे गरजेचे आहे. पर्यावरण सुंदर राहण्यासाठी शेती विकास योजनांबरोबरच वृक्ष लागवड, शहरांची, गावांची स्वच्छता आवश्यक आहे. तसेच वीज प्रत्येक गावात पोहचविण्यासाठी अपारंपरिक उर्जेचा प्रचार आणि प्रसार करावा लागेल. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन सवयी व जीवनशैलीत बदल करावा लागेल. महात्मा गांधी म्हणतात की, 'प्रत्येक व्यक्तीची गरज पृथ्वी भागविते, परंतु प्रत्येक व्यक्तीचा हावरटपणा पृथ्वी भागवू शकत नाही. याचा अर्थ सर्वांनी समजून घेतला पाहिजे. सर्वांनी साधनसंपत्तीचा वापर काटकसरीने, जबाबदारीने केला पाहिजे. साधनसंपत्तीच्या पुर्नवापरावर आपण भर दिला पाहिजे.

जोपर्यंत सामान्य माणूस पर्यावरण संरक्षणासाठी आपल्या रोजच्या आयुष्यातील एक निकडीची बाब आहे असं मानत नाही, तोपर्यंत पर्यावरण संरक्षण केवळ अशक्य आहे. वृक्ष म्हणजे मानवाला दिलेले अमृत वरदान, मानवी जीवन व वृक्ष यांच्यात अतूट असे नाते आहे. भुतलावरील सजीवांच्या विविध गरजा भागविणारे आणखी एक नैसर्गिक साधन म्हणजे पाणी होय. माणूस नकळतपणे पाण्याचा बेसुमार वापर करतो, आपणच पाण्याची बचत कशी करु शकतो ते पुढीलप्रमाणे.

नळ सोडून दाढी केल्यास ५ लीटर पाणी लागते तर मग मध्ये पाणी घेऊन केल्यास १ लिटर पाणी लागेल.

नळ सोडून दात घासल्यास / ब्रश केल्यास ५ लीटर पाणी लागते, तर मगमध्ये पाणी घेतल्यास १ लीटर पाणी लागेल. शॉवरखाली आंघोळ केल्यास ५० लीटर पाणी लागते तर बादलीत पाणी घेऊन आंघोळ केल्यास १० लीटर पाणी लागेल. वाहत्या नळाखाली कपडे धूत असताना १०० लीटर पाणी लागते, तर बादलीचा वापर केल्यास ५० लीटर पाण्यामध्ये काम होऊ शकते. मोटार वाहन धुण्यासाठी मोकळेपणाने पाण्याचा वापर केल्यास १०० लीटर पाणी लागते तर कपडा, बादलीत भिजवून मोटार वाहन धुतल्यास १५ लीटर पाणी लागेल. आता तुम्हीच ठरवा काय करायचे ते, निसर्गासारखा नाही रे सोयरा, गुरु, सखा, बंधू, माय-बाप त्यांच्या कुशीमध्ये सारे व्यापताप, मिटतो क्षणात आपोआप. पर्यावरण वाचवले तरच प्राण वाचतील. जंगले तयार व्हायला हजारो वर्षाचा काळ जावा लागला, मात्र जंगले तोडायला अगदी थोडे दिवस लागतात हे आपण विसरत आहोत.

प्रसिध्द वैज्ञानिक आइन्स्टाईनने ताकीद देत सांगितले होते, वैज्ञानिक विकास हा निसर्गाच्या विरोधात असता कामा नये, त्यावेळी या धोक्याच्या सूचनेला कोणीही गांभिर्याने घेतले नाही. परंतु निसर्गातील साधन संपत्तीच्या अनियंत्रित वापरामुळे आपण अशा ठिकाणापर्यंत येऊन पोहचलो आहोत. निसर्ग आपल्यावर एवढा कोपतो आहे की, आम्ही जी कृती करतो त्याची प्रतिक्रिया म्हणून तो लगेच आपल्याला शिक्षा देण्यास सज्ज होतो.

प्लास्टिक मुक्ती दिन व पर्यावरण दिन साजरे करुन आपण पर्यावरणाबाबत जनजागृती करु शकतो. पर्यावरण स्वच्छ ठेवणार तेव्हा रोगराईस देखील आळा बसेल. आपण मुबलक असणाऱ्या सौर उर्जेचा वापर केला पाहिजे. जर आपल्याला शारिरीकदृष्ट्या सक्रीय, निरोगी जीवन जगायचे असेल तर सर्वांनी आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाची काळजी घेणे गरजेचे आहे.

पर्यावरण वाचवा, भविष्य घडवा।

# जागतिक महामंदी

**कु.पूजा संतोष धुमाळ**
तृतीय वर्ष वाणिज्य

ऑगस्ट १९२९ ते मार्च १९३३ अशी दीर्घकाळ चालू असणारी तीव्रतम जागतिक मंदी. दुसऱ्या महायुध्दापूर्वीच्या काळात भांडवलशाही राष्ट्रातील अर्थव्यवस्थांना तेजी – मंदी चक्राने ग्रासून टाकले होते. ग्रेट ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीनंतरच्या सुमारे दोन शतकांच्या काळातील एकंदर युगकालीन प्रवृत्ती विकासाची असली तरी या विकासात अधुनमधून येणाऱ्या मंदीच्या लाटेमुळे खंड पडत असे. भांडवल गुंतवणूक, उत्पादन, रोजगार, उपभोग खर्च कमी होणे, किंमतीची पातळी खाली येणे, नफा कमी होणे, त्यामुळे पुन्हा भांडवल गुंतवणूकीवर विपरीत परिणाम होणे, हे दुष्टचक्र मंदी काळाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

दुसऱ्या महायुध्दापूर्वीच्या काळात अशा अनेक मंदीच्या लाटा आल्या आणि गेल्या. त्यातील १९२९ मध्ये सुरु झालेली व सुमारे ३ महिने चालू असलेली मंदी सर्वात तीव्र होती, याबद्दल अर्थशास्त्रज्ञांचे एकमत आहे. म्हणूनच या मंदीला महामंदी असे म्हटले जाते. या महामंदीचा फटका जागतिक अर्थव्यवस्थेला सुमारे आठ वर्षे भोवला. जर्मनीच्या राजकारणात हिटलरचा उदय म्हणजेच पर्यायाने दुसऱ्या महायुध्दाचा उगम. या महामंदीतच आढळतो. या मंदीमुळे अर्थव्यवस्थेत ठाण मारून बसलेल्या व तीव्र स्वरुप धारण केलेल्या बेकारीचे कायमचे उच्चाटन कसे करावे, याबाबत अर्थतज्ज्ञ व अर्थशास्त्रज्ञ यांच्या विचारमंथन सुरू झाले, त्याचीच परिणती केन्सवादी आर्थिक विचाराचा उदय व विकास होण्यात झाली.

या काळातील महामंदी अतिशय तीव्र असल्याने तीने सर्व जगाला (रशिया वगळता) ग्रासले असल्यामुळे, ती जागतिक महामंदी होती. तेच उगमस्थान एका देशात म्हणजे अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात होते. या मंदीचा तडाखा सर्वात जास्त शेतीला बसला. भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे व ग्रेट ब्रिटनने स्वार्थासाठी मंदी काळात परतंत्र भारताचा उपयोग घेतल्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाले. शेतीमालाचे भाव कमालीचे उतरले. शेतकरी वर्गाला अत्यंत हलाखी प्राप्त झाली. त्यामुळेच महामंदीच्या काळात भारतातून अभूतपूर्व अशी सुवर्ण निर्यात झाली.

महामंदीचा उगम १९२२ मध्ये सुरु झालेल्या तेजीतच शोधला पाहिजे, या तेजीच्या सात वर्षाच्या काळात पहिल्या महायुध्दानंतर उफळून वर आलेली मागणी, उपभोग खर्चाची वाढलेली प्रवृत्ती, एकंदर आशादायक वातावरण व भांडवल गुंतवणूकीचा अमाप उत्साह आणि बँकांकडून कर्ज मिळण्याची सुलभता यामुळे अफाट भांडवल गुंतवणूक झाली, पण गुंतवणूक जेवढी वाढली त्या मानाने मागणीचा प्रभाव फार काळ टिकू शकला नाही. १९२२ च्या तेजीत उत्पादन शक्ती जेवढी वाढली तेवढ्या प्रमाणात मालाचा उठाव होऊ शकणार नाही, याची जाणीव होताच, गुंतवणूक करणारे निराशाग्रस्त झाले. तेजीतील अतिभांडवल गुंतवणूक हे महामंदीचे प्रमुख कारण होते.

अमेरिकेत महामंदीची सुरुवात झाल्यामुळे आणि तिचे परिणाम उद्योगप्रधान राष्ट्रांपैकी अमेरिकेला विशेष जाणवल्यामुळे अमेरिकेसंबंधीची आकडेवारी दिल्यास महामंदीच्या तीव्रतेची चांगली कल्पना येईल. १९२९ ते १९३३ या काळात अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पन्न ५२ टक्क्यांनी घटले. म्हणजे अर्ध्यापेक्षा अधिक चलनाच्या मापात कमी झाले. वास्तव राष्ट्रीय उत्पन्न ३५ टक्क्यांनी कमी झाले. देशातील रोजगार ३९ टक्के घसरला. औद्योगिक उत्पादन ३६ टक्के, भांडवली वस्तूंचे उत्पादन ४४ टक्के तर नवी घरे बांधण्यात ८७ टक्के कपात झाली. म्हणजे नवी घरे बांधणी जवळजवळ बंदच झाले. एकंदरीने उद्योगधंद्यांत उत्पादन ज्या मानाने घटले, त्या मानाने किंमती घसरल्या नाहीत. शेतीचे उत्पादन सामान्यत: अलवचिक असल्याने ते तसे कमी झाले नाही पण किंमती मात्र वेगाने खाली आल्या.

मंदीचा एक वाईट परिणाम म्हणजे आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य या काळात जवळजवळ संपुष्टात

आले. सर्वत्र देशातील लोकांची क्रीया शक्ती कमी झाल्यामुळे, आंतरराष्ट्रीय व्यापारावर मंदीचा अत्यंत अनिष्ट परिणाम झाला. या काळात औद्योगिक माल व कच्चा माल यांच्या आंतरराष्ट्रीय देवघेवीत अनुक्रमे ४० टक्के व २० टक्के घट झाली. भांडवल गुंतवणूकीस कोणत्याच देशात अनुकूल वातावरण नव्हते. परदेशी गुंतवणूक सुरक्षितही नव्हती. कारण महामंदीच्या काळात आर्थिक राष्ट्रवादाला सहाजिकच जोर आला होता. दुसऱ्या देशातील मंदीची झळ आपल्याला लागू नये, म्हणून प्रत्येक स्वतंत्र राष्ट्र प्रयत्नशील होते. सुवर्ण परिणामावर आयोजित असलेली जागतिक चलनव्यवस्था कोलमडून पडली. सुवर्ण परिणामाचे स्वरुप प्रामुख्याने जागतिक असल्याने, या चलन व्यवस्थेत एका देशात जे घडले, त्याचे परिणाम इतर देशांवर झाल्यावाचून राहिले नाही. सुवर्ण परिणामावर निष्ठा ठेवणाऱ्या ग्रेट ब्रिटन १९३१ मध्ये सुवर्ण परिणामाचा त्याग केला. या महामंदीमुळे आंतरराष्ट्रीय तणाव वाढून दुसऱ्या महायुध्दाची आर्थिक पार्श्वभूमी तयार झाली. अमेरिकेतील महामंदीची नांदी नाट्यपूर्ण होती. ऑक्टोबर १९२९ मध्ये शेअर बाजारातील किंमती धडधड कोसळल्या. इतक्या की त्यामुळे भांडवल गुंतवणूक करणाऱ्यांची उमेद पूर्णपणे खचली व हजारो बँका दिवाळखोर झाल्या. वरवर पाहता शेअर बाजारातील उलथापालथ हे मंदीचे कारण वाटते, पण ते बरोबर नाही, जाणकारांना हे दिसून येईल की, महामंदीचा उगम वास्तव आर्थिक जीवनात होता व तिची चाहूल शेअर बाजार कोसळण्यापूर्वीच दिसू लागल्या होत्या. शेअर बाजारातील उलथापालथ त्यांचा परिपाक होता.

सर्वसाधारणपणे मार्च १९३३ मध्ये महामंदीने आपला निचांक गाठला. त्यानंतर मार्च १९३३ ते १९३७ हा पन्नास महिन्यांचा कालखंड पुनरुज्जीवनाचा काळ मानला जातो. याचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य हे की, बहुतेक सर्व देशांत महामंदीचे निवारण करण्यासाठी राज्य संस्थेकडून क्रियाशीलतेचे धोरण अनुसरण्यात आले. अमेरिकेत केन्सवादी नव्या आर्थिक विचारांशी सुसंगत असलेल्या अध्यक्ष रुझवेल्ट यांच्या नवनीतीने (न्युडील) महान कामगिरी केली. जर्मनी हिटलरनेही तुटीचा अर्थपुरवठा, मोठ्या प्रमाणावर सरकारी गुंतवणूक ही तंत्रे उपयोगात आणली. ग्रेट ब्रिटनने आर्थिक स्थिती सुधारली, त्याचे परिणाम इतर देशांतही दिसू लागले. पण या ठिकाणी लक्षात घेण्याची मुख्य गोष्ट म्हणजे महामंदीने जुन्या आर्थिक विचारांना जबर धक्का दिला. विशेषत: अर्थव्यवस्थेच्या बाबतीत सरकारचे धोरण निष्क्रीयतेचे, निर्हस्तक्षेपाचे असावे, हा सनातन आर्थिक विचार कायमच गाडला गेला. मंदीच्या काळात सरकारचे उत्पन्न कमी होते. म्हणून सरकारने अर्थसंकल्पीय समतोलासाठी आपला खर्च कमी करावा, ही जुन्या अर्थशास्त्राची शिकवण होती. रुझवेल्टपूर्वीच्या हूव्हर या अध्यक्षांनी ती तंतोतंत पाळण्याचा प्रयत्न केला व महामंदीला राज्य संस्थेचा हातभार लागला. ही जुनी शिकवण झुगारुन देण्यात आली आणि महामंदीचे निवारण करण्यात सरकारने पुढाकार घेतला. केन्सवादी अर्थशास्त्राला मिळवून देण्याचे सहकार्य महामंदीने केले. असेच म्हटले पाहिजे. मंदीची चाहूल वेळीच ओळखून योग्य ते उपाय करण्याचे तंत्र आता अंगवळणी पडल्यामुळे १९२९ च्या महामंदीची पुनरावृत्ती होणार नाही अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

■■■

**पराभवाने माणूस संपत नाही,**
**प्रयत्न सोडतो तेव्हा संपतो,**
**कठीण काळात सतत स्वत:ला सांगा,**
**शर्यत अजून संपलेली नाही,**
**कारण मी अजून जिंकलेलो नाही..**

**-डॉ.प्रकाश बाबा आमटे**

# चंद्रयान - २

## कु.आकांक्षा नवनाथ पन्हाळे
तृतीय वर्ष वाणिज्य

''अंतराळ हा तुझाच, पंख तुला स्वप्नांचे..
चंद्रबिंब प्रतिभेचे, तारांगण शब्दांचे..'

पृथ्वीचा एकमात्र नैसर्गिक उपग्रह चंद्रावर भारताने आपली दुसरी सर्वात महत्वाकांक्षी मोहिम 'चंद्रयान - २' दि.२२ जुलै २०१९ रोजी आंध्र प्रदेशातील श्रीहरी कोटावरुन सर्वात शक्तीशाली रॉकेट लॉन्चर जीएसएलवी मार्क तीनच्या माध्यमातून प्रक्षेपित केले. ही मोहिम चंद्रावरील पाण्याचे अस्तित्व आणि भविष्यात चंद्रावर माणसाच्या राहण्याचा संभवतेची चाचणी करेल, जवळपास ९७८ करोड रुपये खर्च आलेला 'चंद्रयान - २' ला चंद्रावर पोहचण्यासाठी ३,८४,४०० किलोमीटर अंतर पार करावे लागेल. हे प्रक्षेपण १५ जुलै रोजीच होणार होते. मात्र तांत्रिक अडचणीमुळे याची तारीख बदलण्यात आली होती.

'चंद्रयान -२' हे चंद्राच्या दक्षिणी ध्रुव क्षेत्रात उतरेल. या क्षेत्रात आजपर्यंत कोणताही देश गेलेला नाही. इस्त्रोचे प्रमुख के. सिवन यांच्यानुसार मिशनांतर्गत पाण्याचा शोध घेईल तसेच सौर मंडळातील जिवाश्मांचा देखील शोध घेईल. असे यान पाठवणारा भारत हा जगातील चौथा देश ठरला आहे. चंद्रयान-२ मधील १.४ टनाचे लॅडर, त्यासोबत असलेल्या २७ कि.ग्रॅमच्या रोव्हरला चंद्राच्या दक्षिणी ध्रुवावरील दोन क्रेंटरोच्या मध्यभागी उतरवेल. लँडीग नंतर रोव्हर चंद्रावरील मातीचे रासायनिक विश्लेषण करेल. तर विक्रम नाव असलेले लँडर त्यासोबत असलेल्या चंद्रावरील तलाव अथवा पाण्याच्या तळांचे मापन करेल.

**प्रक्षेपण झाल्यानंतर पुढे काय?**

पृथ्वीपासून १८१.६ किमी अंतरावर गेल्यावर चंद्रयान-२ प्रक्षेपकापासून वेगळं झालं.

यानंतर २३ दिवस चांद्रयान पृथ्वीच्या कक्षेत राहील.

३० ते ४२ दिवसात चांद्रयान चंद्राच्या कक्षेत प्रवेश करेल.

४८ व्या दिवशी विक्रम हे लँडर आणि प्रग्यान हे रोव्हर चंद्राच्या पृष्ठभागावर उतरेल.

चंद्राच्या पृष्ठभागावर उतरणारा भारत हा अमेरिका, रशिया, चीन नंतर जगातील चौथा देश बनेल तर दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश ठरेल.

७ सप्टेंबर रोजी चंद्रावर सॉफ्ट लँडींग होईल.

**चंद्रयान -२ चे तीन भाग -**

चांद्रयान - २ ला तीन भागात विभागण्यात आले आहे. जो चंद्राच्या कक्षेत राहील. दुसरा भाग लँडर ज्याचं नाव आहे, विक्रम. ते चंद्राच्या पृष्ठभागावर उतरेल तर तिसरा भाग आहे, प्रग्यान जो रोव्हर असून तो चंद्राच्या पृष्ठभागावर फिरत राहील.

**चंद्रयान २ मोहिमेची वैशिष्ट्ये :-**

१)चंद्रयान तब्बल ३ लाख ८४ हजार किलोमीटर अंतर पार करुन चंद्रावर पोहचवणार.

२)चंद्रावर पोहचवण्यासाठी चांद्रयान -२ ला ५५ दिवसांचा कालावधी लागणार.

३)चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर रोवर प्रज्ञान उतरले.

४)चंद्रावर उतरल्यानंतर प्रज्ञान चंद्रावरची माहिती कंट्रोल सेंटरला पाठवणार.

चंद्रयान - २ च्या निर्मितीसाठी ६०३ कोटी रुपये खर्च आला असून प्रक्षेपणासाठी अतिरिक्त ३७५ कोटी रुपये लागणार आहेत. चांद्रयान २ आणि जीएसएलव्ही मार्क ३ च्या निर्मितीसाठी भारतातील सुमारे ५०० विद्यापीठे आणि १२० कंपन्यांचा सहभाग आहे. मोहिमेसाठी आलेल्या एकूण खर्चाचा बहुतांश वाटा या कंपन्या आणि विद्यापीठांना देण्यात आला आहे.

# दुष्काळाने भिजलेल्या..

कु. पूजा अनिल गोर्डे
द्वितीय वर्ष विज्ञान

दुष्काळाने भिजलेल्या माझ्या बापाचा संसार,
वर टांगता फाशीचा दोर
मागे लागला कर्जाचा जोर
चक्री व्याज भूत घोर।
दुष्काळाने भिजलेल्या माझ्या बापाचा संसार
साऱ्या जीवनालाच  अंधार
नाही वेळेला पाऊस
मात्र दुष्काळाचे चटके मात्र वारंवार
दुष्काळाने भिजलेल्या माझ्या बापाचा संसार
घर मोडके छप्पर,बैल नाही शेतावर,
ना पेरणी ना औतकाठीचा आधार
दुष्काळाने भिजलेल्या माझ्या बापाचा संसार
भुकेने पोटाची खळगी झालेली पोरं सोरं
नाही अन्नाचा कण याचीच तर हुरहुर
नाही केली मागची दिवाळी,
यंदा तरी काढू दरिद्री पण,
दुष्काळाने भिजलेल्या माझ्या बापाचा संसार.

# सुंदर आयुष्य..

कु.अर्पिता संजय गजे
तृतीय वर्ष वाणिज्य

आयुष्य जिंका, स्वप्न पहा, विश्वास ठेवा आणि काळजी घ्या.
आपलं जीवन हे शून्यातून उभं करायचं असतं
हारायचं नसतं, थकायचं नसतं
जीवनात उंच भरारी घ्यायची असते..
कोणी चुकलं तर मोठ्या मनानं माफ करायचं असतं,
चूक झाली तर मोठ्या मनाने सॉरी बोलायचं असतं
आणि झालं गेलं जिथल्या तिथेच सोडायचं असतं
जगाच्या या रंगमंचावर असं वावरायचं असतं
की, आपली भूमिका संपल्यानंतरही टाळ्या वाजत राहिल्या पाहिजेत..
परमेश्वरानं जे जे दिलं आहे, त्यात समाधान मानायचं असतं..
आयुष्य खूप सुंदर असतं, त्यात आपणही हसायचं आणि इतरांनाही हसवायचं असतं
जगातील सर्वात सुंदर रोपटं विश्वासाचं असतं,
ते जमिनीत नाही तर आपल्या मनात रुजवायचं असत..
जीवन म्हणजे छोट्या छोट्या गोष्टींतूनही आनंद घेणं असतं,
एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून प्रगती करणं असतं..
जीवनात मोठं होण्यासाठी श्रीमंताच्याच घरी जन्माला येणं गरजेचं नसतं
नदीला वाहण्यासाठी कुठल्याही रस्त्याची गरज नसते.
जे आपल्या हिंमतीच्या जोरावर जीवन जगतात,
त्यांना ध्येयापर्यंत पोहचविण्यासाठी कुठल्याही रथाची गरज नसते.
मोठा तोच होतो, ज्याचा स्वत:च्या मनगटावर विश्वास असतो,
छातीवर आव्हाने घेऊन जगायचं असतं
नजरेतूनच आयुष्याला उत्तर द्यायचं असतं
अंधाराला दूर लोटायचं असतं,
स्वप्नांची मजा घेत आयुष्य जगायचं असतं
आयुष्य म्हणजे दांडगी इच्छा असेल तर
संकटातून हसत खेळत बाहेर पडणं असतं
पाय जमिनीवर ठेऊन जगायचं असतं,
आकाश मिठीत घेताना, ओठावरचं गोड हसू असतं,
काळीज काढून देताना, संकटांना ठणकावून सांगायचं असतं,
कितीही संकटं आली तरी आत्मविश्वासाने हसत खेळत जगायचं असतं.
आयुष्य जगताना स्वप्न पहायची असतात,
नेहमी आनंदी आणि हसतखेळत आयुष्य जगायचं असतं,
संकटांना हसतखेळत सामोरे जायचं असतं..

घर हे दोघांचं असतं, एकाने पसरलं तर दुसऱ्याने सावरायचं असतं
आपल्या मनातील भाव जसा असतो, तसाच सगळा निसर्ग आपल्याला दिसतो
आपल्याकडे बघून इतरांना जगण्याचा उत्साह मिळावा, असं जगायचं असतं.
आपल्यामुळे इतरांना स्फुर्ती मिळावी, असं जगायचं असतं.
प्रत्येक गोष्टीचं पॉझिटीव्ह थिंकींग करायचं असतं
आयुष्य जगताना..
बोलणाऱ्याची मातीही खपते,
पण न बोलणाऱ्याचं सोनंही खपत नाही..
यशस्वी होण्यासाठी कधीही पैसा कसा मिळवावा,
याचा विचार करायचा नसतो आपला मान कसा वाढेल,
याचा विचार करायचा असतो.
लढाईत बंदूक लढत नाही, तर बंदूक धरणाऱ्याचा हात लढत असतो,
बंदूक धरणाऱ्याचं मनाचं सामर्थ्य आणि आत्मविश्वास लढत असतो.
आपल्याला विश्वास समजला तर आपण जग जिंकू शकतो.
आपल्यामधल्या राजहंसाला शोधायचं चांगलं ते घ्यायचं असतं
आणि वाईट सोडून द्यायचं असतं.
आयुष्य खूप मौल्यवान आहे, भरभरुन जगा
जगण्यासाठी दोनच पर्याय आशा किंवा निराशा
मग सांगा कसं जगायचं,कष्टत कष्टत की गाणं म्हणत,
स्वत:वर आणि जगण्यावर भरभरुन प्रेम करा,
हसत राहिलात तर सगळं जग तुमच्याबरोबर राहील..
आपल्याजवळ काय नाही, याचा विचार करण्यापेक्षा
आपल्याकडे काय आहे, याचा अभिमान असावा,
छोट्या मोठ्या गोष्टींतून सुध्दा मोठा आनंद घ्यायचा असतो,
निसर्गाने आपल्याला जे दिले आहे, त्याचे सुख भरभरुन घेण्यापेक्षा,
एक काळा ठिपका जो आयुष्यातला काहीतरी प्रश्न असतो,
त्याकडे आपले लक्ष  जाते, पण कोऱ्या पानांकडे कोणाचे लक्ष जात नाही.
मग तुम्हीच ठरवा आपण कसं जगायचं? कण्हत कण्हत की गाणे म्हणत,
रोज सकाळी उठल्यावर परमेश्वर आपल्या हातात
चोवीस तासांचा एक कोरा चेक देत असतो,
त्यावर किती आकडा टाकायचा हे आपण ठरवायचे असते..
जोपर्यंत दिवसाचे चोवीस तास कमी पडतात,
तोपर्यंत आपण तरुण असतो,
पण जेव्हा तेच चोवीस तास खायला उठतात,
तेव्हा आपण म्हातारे झालेले असतो,
म्हणून आयुष्य हसतखेळत जगा,
आयुष्य लहान आहे, पण खूप सुंदर आहे.

# महापूराचा प्रकोप

कु.गोर्डे अस्मिता मधुकर
प्रथम वर्ष, बी.सी.एस.

निसर्गाचा कोप झाला, कोसळले आभाळ
कुणी न उरले सोबतीला कुणाचा आधार
आकाशाच्या छायेखाली अफाट अशा धरणीवरती
भरकटत फिरतो इकडे – तिकडे अन्नाच्या शोधात
बंधुभाव हो दाखवा आता द्या मदतीचा हात
तुम्हा शिवाय कुणी न आमचे तुम्हीच माय – बाप
घरे गेली, दारे गेली झालो रे कंगाल
काय झाले पाप हातून सजा ही मिळे आम्हा
मुले बाळे पोरकी रे दीनवाणी हिंडती
आग पोटाची विझवाया, कुटका भाकरीचा मागती
दया करा हो मायबाप तुम्ही आमचे सर्वस्व
तुम्ही तारणार तुम्ही तारणार होतील आजन्म उपकार



# दुष्काळ

**गोर्डे अस्मिता मधुकर**
प्रथम वर्ष बी.सी.एस.

जेव्हा दुष्काळ पडतो,
तेव्हा भेगा जमिनीला नाही तर काळजालाही पडतात
विहिरीचे पाणी जेव्हा तळ गाठते,
तेव्हा अश्रू ही कोरडवाहू बनतात
घोटासाठी घाटा घाटातून पिळवटलेल्या वाटा
तापलेली माती पायी बोचलेला काटा
सुकलेले ओठ, आटलेलं पोट
डोईवरुन सूर्य ओकतो ज्वाळेचा लोट
रानोमाळच्या पाखरांचा मुका होतो चिवचिवाट
गावो गाव, खेडो पाडी फक्त एकच शुकशुकाट
पानवठे सुकले सारे, सुनी झाली पाऊलवाट
आभाळाला वाकुल्या देते जीर्ण द्रोर्याची मुडकी खाट
गायी, गोठे खपाट झाले सपाट झाल्या राणी
कत्तलखाने रंगून गेले चीपाट दुभत्या तान्ही
कुणाचा जीव घुटमळतो तर कुणाच्या गळ्यात फाशी
हे समदं घडतयं या देशात, भारतात, महाराष्ट्रात
जेव्हा दुष्काळ पडतो,
तेव्हा भेगा जमिनीला नाही
तर काळजालाही पडतात..

# फौजी

**जगधने अश्विता बाळासाहेब**
तृतीय वर्ष विज्ञान

फौजी म्हणून निवड होता
गावचा आनंद गगणी भिडला
जेव्हा दिवस ड्युटीचा आला
नकळत प्रत्येक जण
गळ्यात पडून रडला।।
जबाबदारीकडे पाहून मी
घालतो अश्रुंना आवर
आई माझी हळवी तिला
डोळ्यात पाणी झालं अनावर।।
काळजी घे म्हणतात वडील
पाठीवर हात ठेऊन
निरोप देतात अभिमानाने
आईचे डोळे पुसून ।।
सुट्टीची चाहूल लागता
मन गावाकडे पुन्हा वळत
ते दिवस मित्रांसोबतचे संपतात
मग मात्र बेचैन होत।।
प्रत्येक क्षणाला तुम्ही
जोडीने घर सजवल
संसाराच अर्ध स्वप्न आम्ही
फोनवरच रंगवल
संक्रातीला सजलेली बायको
म्हणते फोटो माझे आवडले का?
मनी माझ्या सुटतं वादळ
पुन्हा तिला या रुपात मी बघेन का ।।
स्वप्नात येऊन मला म्हणाली
पप्पा तुम्ही येणार कधी
दचकून जाग येते तेव्हा
वाटत जाऊन भेटावं
त्यांना आधी।।
जव्हा मी गावी जाणार
तोच आनंद जल्लोष होणार
माहीत नसतं हे ही
उद्याचा  दिवस कसा येणार की
माझ्या गावी तिरंग्यात मी जाणार।।
तरीही म्हणतो या वर्दीचा
अभिमान असाच रहावा
तिरंगाच माझा गणवेश व्हावा
प्रत्येक दिवस असेल शत्रुसाठी
सांडावे रुधिर या मातृभूमीसाठी।।
छाती ठोकून म्हणतील सारे
अभिमान वाटतो तुझा
गर्वाने म्हणेल बायको माझी
लाखात एक फौजी माझा।।



# हिंदी विभाग

विभागीय संपादक
**प्रा.गोरक्ष इदे**
**प्रा.बाळासाहेब शेटे**
**प्रा.रोहिणी डावरे**

# अनुक्रमणिका

## हिंदी विभाग


| अ.क्र | विषयाचे नाव | लेखकाचे नाव/कवी | वर्ग / पद | पृ.क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधी और पर्यावरण | विशाल लहानु जेडगुले | तृतीय वर्ष बी.ए. | ३२ |
| २ | हिंदी कथा साहित्य मे किन्नर विमर्श | प्रा.डॉ.दिपाश्री गडाख | प्राध्यापिका | ३४ |




# महात्मा गांधी और पर्यावरण

कु.विशाल लहानु जेडगुले
तृतीय वर्ष कला

गांधीजी ने कहा था कि आधुनिक शहरी औद्योगिक सभ्यता में ही उसके विनाश के बीज निहीत है। इस अर्थ में उनकी किताब 'द हिंद स्वराज' टिकाऊ विकास का घोषणापत्र है। उनके अनुसार असली सभ्यता अपने कर्तव्यों का पालन करना और नैतिक और संयमित आचरण करना है। उनका दृष्टिकोन था कि लालच और जुनून पर अंकुश होना चाहिए। टिकाऊ विकास का केंद्रबिंदू समाज कि मौलिक जरुरतों को पूरा करना होना चाहिए।

उचित उपचार और उपायों के जरिए वायू प्रदुषण तथा जल प्रदुषण को रोकना स्थिरता और टिकाऊ विकास का आवश्यक पहलू है। यहाँ यह ध्यान देने योग्य है कि महात्मा गांधी जी जब १९१३ मे दक्षिण अफ्रिका में अपने पहले सत्याग्रह आंदोलन की अगुआई कर रहे थे तभी उन्होंने यह महसूस कर लिया था की, आधुनिक समाज में शुध्द हवा पहुँचाने के लिए कुछ प्रयास करने की आवश्यकता है। तब उन्होंने अपने एक लेख में 'कि टु हेल्थ' में शुध्द हवा की जरुरत पर रोशनी डाली. इसमें शुध्द वायू पर अलग से अध्याय है जिसमें कहा गया कि शरीर को तीन प्रकार के प्राकृतिक पोषण की आवश्यकता होती है। हवा, पाणी और भोजन के लिए हवा आवश्यक है, वह कहते है की प्रकृति ने हमारी जरुरत देखते हुए हमें जिवन जिने के लिए पर्याप्त वायू मुफ्त में ही दी है पर उनको इस बात का दुःख था कि आधुनिक सभ्यता ने इसकी भी किंमत तय कर दी है।

गांधीजी ने १९३० के दशक में कहा था कि सभी नागरिकों को शुध्द हवा और पाणी उपलब्ध होना जाहिए। आज से १०० (सौ) साल पहले शुध्द हवा पर गांधी जी की समझ, चिंतन और भारत की स्वतंत्रता व लोकतंत्रक प्रति उनके विचार आज इक्कीसवी सदीं में भी उन्हे समकालिन बनाते है।

पर्यावरण के संबंध में कि गई कई टिप्पणियों से यह स्पष्ट होता है कि, उन्होंने कैसे उन अधिकांश पर्यावरणीय समस्यांओ का अनुमान लगा लिया था, जिनका सामना यह दुनिया वर्तमान में कर रही है, यदी हम जलवायू परिवर्तन संबंधी वर्तमान वादविवाद को देखें तो जिस व्यग्रता से पश्चिमी देश उभरते हुए देशों को अपना कार्बन उत्सर्जन कम करने के लिए समझा रहे है आर विकसित देशों द्वारा जलवायू परिवर्तन की गति को कम करने के लिए अरबों डॉलर खर्च किए जा रहे है, उससे गांधी जी की भविष्यवाणी सच होती दिख रही है। यद्यपी 'स्मॉल इन ब्युटीफुल और लिमिटिस टू ग्रोथ' जैसी किताबों के जरिए सत्तर के दशक में हमें पर्यावरणीय संकट के बारे में जागरुक किया जा चुका था। परंतु दुनिया को इसकी गंभिरता को समझने में एक दशक से अधिक का समय लग गया।

आज पर्यावरण रक्षा के नाम पर वृक्षारोपण का जो अभियान चलाया जा रहा है, उसके महत्य से गांधी जी भी अवगत थे। और अपने धर्म का दायरा विस्तृत करते हुए उसमें पेड पूजा को भी उन्होंने शामिल कर लिया था। उन्होंने कहा था की जब हम किसी पुस्तक की पवित्रता समझकर उसका आदर करते हैं। तो हम मूर्ति पुजा ही करते है। पवित्रता या पुजा के भाव से मंदिरों मे या मस्जिदों मे जाने का भी वह अर्थ है, इन बातों से मुझे कोई हानि नहीं दिखाई पडती. ऐसी हालत में पेड पूजा में कोई मौलिक बुराई या हानि दिखाई देने के बजाय मुझे तो इसमें एक गहरी भावना और काव्यमय सौंदर्य ही दिखाई देता है। वह समस्त वनस्पती जगत के लिए सच्चे पुजा - भाव का प्रतीक है। पेड के बिना इस पृथ्वी पर जीवधारी

एक क्षण के लिए भी नही रह सकते। इसलिए ऐसे देश में जहाँ खास तौर पर पेडों की कमी है, वृक्ष पूजा का गहरा अधिक महत्त्व हो जाता है।

दुनिया में अकाल और पानी की कमी के संदर्भ में गांधी जी के विचारों को याद करना बहुत महत्वपूर्ण है। आजादी के लिए संघर्ष के दौरान वह गुजरात के काठियावाड क्षेत्र में होनेवाले अकालों पर चिंतीत थे। पानी की कमी के मुद्दे पर उन्होंने सभी रियासतों को सलाह दी थी कि सभा को एक संघ बन कर दीर्घकालिक उपाय करने चाहिए और खाली भूमी पर पेड लगाने चाहिए। उन्होंने बडे पैमाने पर वनों के काटने का भी विरोध किया था। आज २१ वी सदी में गांधी जी की बात और भी ज्यादा महत्त्वपूर्ण हो गई है।

अंग्रेजो नें वनों को बस धन कमाने का जरिया समझा था। इसके साथ ही गांधीजी ने वर्षा जल संचयन पर भी जोर दिया था। १९४७ में दिल्ली में प्रार्थना में बोलते समय उन्होंने बारिश के पानी के प्रयोग की वकालत की थी और इससे फसलों की सिंचाई पर जोर दिया था। किसानों पर २००६ में प्रस्तुत अपनी रिपोर्ट में स्वामीनाथन आयोग ने भी सिंचाई की समस्या को हल करने के लिए बारिश के पानी के उपयोग की शिफारीश की थी। गांधीजी अपने इस पर्यावरण के प्रेम और जागरुकता के विचारों से कई देशों को प्रेरित करते है।

एक पुस्तक सर्विविंग द सेंच्युरी - फेसिंग कलाऊड कैओस जो प्रोफेसर हर्बर्ट गिरार्डेट द्वारा संपादीत कि गई है, उसमें चार मानक सिध्दांतो - अहिंसा, स्थायित्व, सम्मान और न्याय को इस सदी और पृथ्वी को बचाने के लिए जरुरी बताया गया है। धीरे - धीरे ही सही दुनिया गांधी जी और उनके बताए रास्तों को अपना रही है। ये सिध्दांत सदैव उनके जीवन के केंद्र में रहे।

'द टाईम मैग्जीन' ने अपने ९ अप्रैल २००७ के अंक में दुनिया को 'ग्लोबल वार्मिंग' से बचाने के ५१ उपाय छापे। इनमें ५१ वा उपाय था, कम उपभोग, ज्यादा साझेदारी और सरल जीवन। दुसरें शब्दों में कहे तो टाईम मैग्जीन जैसी पत्रिका जिसे पश्चिमी देशों का मुखपत्र कहा जाता है, वह अब ग्लोबल वार्मिंग के खतरे को रोकने के लिए गांधी जी के रास्तों को अपानाने के लिए कह रही है। यह सभी तथ्य बताते हैं कि, पृथ्वी को बचाने के लिएगांधी जी की मौलिक सोच और उनके विचार कितने महत्वपूर्ण और गहरे है। इसलिए पर्यावरण बचाने हेतू गांधीजी के विचार फिर से समझना जरुरी है।

सतत विकास एवं पर्यावरण संरक्षण को लेकर गांधीजी शिक्षा पर जोर देते हुए भारतीय राजदूत ने कहा था, ''महात्मा गांधी के समय पर्यावरण चिंता का बडा विषय नहीं था, उक्त विचारों से उनकी दूरदर्शिता झलकती है, वह पर्यावरण संबंधी चिंताओं को समझते थे और उन्होंने तब जो विचार पर्यावरण की समस्यांओ को लेकर प्रकट किए थे। उन्हे स्वभाव में लाना होगा, तभी भविष्य में पर्यावरण समस्या कम होगी।''



# हिंदी कथा साहित्य में किन्नर विमर्श

प्रा.डॉ.दिपाश्री कैलास गडाख
सहाय्यक प्राध्यापिका, हिंदी विभाग

हमारे समाज का ताना-बाना मर्द और औरत से मिलकर बना है। लेकिन एक तीसरा जेंडर भी हमारे समाज का हिस्सा है इसकी पहचान कुछ ऐसी है जिसे सभ्य समाज में अच्छी नजर से नही देखा जाता। समाज के इस वर्ग को थर्ड जेंडर, किन्नर, तृतीयलिंगी, उभयलिंगी या हिजडे के नामोसे जाना जाता है। यह तृतीयलिंगी समाज हशिये पर जीवन जीते हुए अपनी अस्मिता और जीवन दोनों को बचाने के लिए जिद्दजोहाद कर रहे है हिंदी साहित्य में पिछले कई वर्षो से हशियो पर जीवनयापान कर रहे किन्नर समाज पर लिखा जा रहा है। एक्कीसवी सदी में तो किन्नर समाज को केंद्रीत कर बहुत अधिक साहित्य लिखा गया है और लगातार लिखा जा रहा है। इन सारे साहित्य को यदी परखा जाये तो इनमे हमें किन्नरो के जीवन के सामाजिक यथार्थ की छवी साफ नजर आएगी। समाज में हशिये पर जीवन व्यतीत करने वाले इन उभयलिंगी लोगो को साहित्य में पहचान मिली है। आज कुछ हद तक इन्हे समाज में भी सम्मान मिला है। फिर भी इनका जीवन आज भी सघर्षमय है। तृतीयलिंगी समुदाय आज न केवल हशिये पर जीवन व्यतीत कर रहा है बल्कि एक मनुष्य होने के बावजुद दुय्यमदर्जे का जीवन जीने को मजबूर है।

किन्नर समाज के लोग अपनी आलिंगी देह को लेकर जन्म से मृत्यू तक अपमानित, तिरस्कृत और संघर्षमयी जीवन व्यतीत करते है। तथा आजीवन अपनी अस्मिता कि तलाश में ठोकरे खाते है। समाज में लोग किन्नरो कोहीन दृष्टी से देखते है। इसी कारण उन्हे कोई व्यवसाय भी नही मिलता। किन्नरो के समक्ष पैसा कमाने के दो हि जरीये बचे है, या तो भीख मांगना या फिर देह व्यापार। घर पर नाच गाने के लिए जाना और वहाँ पहुँच कर घर वालों से बधाई मांगना आसान नहीं है। घर परिवार के लोग इन्हे घर में आने नही देते। इसका कारण है समाज का इनके प्रति नकारात्मक दृष्टीकोन। हिंदी साहित्य में लिखी आत्मकथाओं का अवलोकन करने पर सहज ही ज्ञात होता है कि इन किन्नरो का जीवन कितना कठीन और संघर्ष से भरा है।

किन्नर समाज पर बात करते हुए सबसे पहले तो हमें यह जानने की जरुरत है कि, वे लैंगिक विकलांगता के शिकार है। हमें उनके प्रति उदार और सहिष्णू होना होगा। उनकी अस्मिता और उनके अस्तित्व को स्वीकार करना होगा। इस संदर्भ में माननीय सर्वोच्च न्यायालय ने एक सकारात्मक और सार्थक पहल की है। जहाँ उन्होंने विगत १५ अप्रेल २०१४ में आलोच्य समाज को भारतीय संविधान के अनुच्छेद १९ (१) के तहत निजता और वैयक्तिक स्वतंत्रता से सम्बन्धित सभी अधिकार दिये एवं केंद्र तथा राज्य सरकारोंको शीघ्रता से इस संबंध में कार्यवाही के आदेश दिए। इसके साथ ही उन्होने इन्हे (किन्नर समाज) अन्य पिछडा वर्ग के तहत विविध नौकरीयो एवं शिक्षण संस्थानों में आरक्षण पाने का अधिकार भी माना है।

सन १९९४ में लैंगिक विकलांग को मतदान कि मंजुरी दी गई जिससे किन्नरों के लिए राजनीति के रास्ते खुल गए। मतदाता में किन्नरो के लिए राजनीति क्षेत्र में सफलता पाने वाली पहली किन्नर हिसार, हरियाणा की शोभा नेहरू है, जो कि १९९५ में हुए नगर निगम के चुनाम में पार्षद चुनी गयी थी। श्री गंगानगर, राजस्थान में भी किन्नर बसंती पार्षद बनीं।

इस प्रकार हिंदी कि कुछ कहानीयों में किन्नर

विमर्श दिखाई देता है, इसकी चर्चा निम्नलिखित है। 'कुसुम असंल की कहानी' मुर्दन का गांव में भी लैंगिक विकृती से पीडित लोगों की व्यथा को उजागर किया। इस कहानी कि पात्र सिलामा कहती, भाग्य की बात है, हम जब अलिंगी पैदा हुए है, एसेक्स्यूयल, इसी से यहा रहने को मजबूर है। (अंसल:१०६). कुसुम अंसल किन्नर गुरु जया के मुख से यह कहलाती है। कि जन्म तो किसीके बस कि बात नही। अत: सबको जिने का अधिकार मिलना चाहिए। हमारे समाज में कही – कही किन्नरो को ख़ुशी के मौके पर शुभ मानकर उनका आशीर्वाद प्राप्त किया जाता है। शिशु के जन्म पर, विवाह के अवसर पर या गृहप्रवेश के वक्त किन्नरो का आशीर्वाद शुभ माना जाता है। 'ई मुर्दन का गावं' कि किन्नर गुरु जया कहती है, बांझ औरते हमारे पास बच्चे कि कामना से आती है और ताज्जूब, हमारा आशीर्वाद फलता भी है किसी भी बच्चे का जन्म हमारे, नाच – गाने के बिना पुरा नही होता। आशीर्वाद देते है तो गंदे– गंदे अल्फाज फुहडसे गाने भी गाते है। (अंसल: १०७)

डॉ.लवलेश दत्त की कहानी नवाब चरित्र प्रधान कहानी है। जिसमे कहानीकार ने किन्नर को करुणा, त्याग और प्रेम आदि गुणोसे युक्तआम इंसान माना है। नवाब एक किन्नर होने के बावजुद लिंगौपासक समाज से कई गुना अधिक सभ्य है। वह विशेष अवसरों पर घरों में जाकर बधाई देता है। संयोगवंश एक दिन एक मंदिर के पास झाडीयों फेकी हुई छोटी बालिका मिलती है। तब वह उसकी देखभाल करने की जिम्मेदारी लेता है, और नवाब को मुख्याधारके लोगों का विरोध भी सहन करना पडता है क्योंकी वे लोग उस पर चोरी का इल्जाम लगाते है। इसके बावजुद भी वह हार न मानते हुए उसें अपनी बेटी के रूप में अपनाता है। परंतु लोगों कि मानसिकता हमेशा स्त्री के प्रति शरीर भोगी वस्तू बनकर रही है। किन्नर के प्रति भी नकारात्मक सोच बनाये रखते हुए, उनका शोषण किया जाता है। यही हाल एक दिन सभ्य कहे जाने वाले समाज के एक पुरुष ने जया के साथ नवाब को देख कर बोलता है क्यो नवाब.... बहुत माल बनेगी यह.. तुम्हारा बुढापा तो सुधार हि जायेगा.. इसप्रकार ताने–बाने सुनाई देते है। इसी कारण नवाब किन्नर का पेशा छोडकर जया की देखभाल करता है तब भी निची सोच वाले लोग नवाब को ताने मारते की, बुढापे में काम आएगी, माल है इसतरह बाते करते है। किन्नर के प्रति नकारात्मक सोच के भय से जया को नारी निकेतन में भेज देते है। उसके बिमार होने पर स्वयंम के गुर्दे निकालकर जयाका प्राण बचाता है। सामान्य समाज में इसप्रकार कोई कर सकता है क्या? और जब जया शादी करने लायक होती है, तो उसे कन्यादान करने का अवसर तक देना नही चाहते है। तब भी संघर्ष कर के वहां पहुँचता है तो उसे किन्नर कह कर उपेक्षित किया जाता, तब जया कहती है कि, यही मेरे मा– बाप है, जो मुझे मौत के मुहसे बचाया। अगर मेरे से शादी करना है तो मेरे बापू ही मेरा कन्यादान करेंगे। वे कहती कि मुख्यधारा के लोगों को किन्नरो को उपेक्षित करंना आता है, पर उन्हे समझा कभी नही गया कि वाकई वे सामान्य समाज से कितना ठीक है। उनमे भी कितने सभ्य गुण है जो कुछ समाज के लोगो में नही है।

निष्कर्षता: हम कह सकते है कि,मनुष्य के जीवन में रिश्ते–नाते बहुत महत्त्व रखते है। किन्नर हो या साधारण बच्चा सभी रिश्तो के लिए तडपते है। ऐसी स्थिती में यदि उस बच्चे को घर से बेघर कर दिया जाए और दर–दर भटकने के लिए छोड दिया जाए तो वह आतंकित होगा ही और दूसरो को भी आतंकित करेगा। 'जेनेटिकडिफेक्ट' के कारण यदि कोई बच्चाकिन्नर के रूप में पैदा होता है तो इसमे उसका क्या दोष है ? उसे भी तो जीने का अधिकार है। आज समय के साथ सोच भी बदल रही है। कुछ किन्नर पढ–लिखकर अपने पैरो पर खडे हो रहे है। साथ ही दूसरों के लिए भी राह दिखा रहे है। वे भी हर क्षेत्र में सक्रीय हो रहे है; अपनी उपस्थिति दर्ज करा रहे है, हशिया छोडकर केंद्र में आ रहे है। फिर भी इस समाज को उन्हे अपनाने में वक्त लगा है।

# वार्षिक अहवाल

# नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र

## अहवाल २०१९-२०

शैक्षणिक वर्षात प्रथम सत्रामध्ये केंद्राच्या वतीने 'एमपीएससी/युपीएससी कार्यशाळा' घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये युनिक ॲकॅडमीचे प्रा. विनय इंगळे व प्रा. रोहित बारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रामध्ये ज्ञानदीप ॲकॅडमी, पुणेचे संचालक प्रा. महेश शिंदे यांचे 'स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना' या विषयावर व्याख्यान झाले. सनदी लेखापालची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी वैभव मालुंजकर याचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

४० विद्यार्थी क्षमतेची स्वतंत्र अभ्यासिका, दैनंदिन मार्गदर्शन, विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा सातत्याने घेतला जाणारा आढावा, इंटरनेट सुविधा व सीसीटीव्ही ही या केंद्राची वैशिष्ट्ये होत. विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी संदर्भ पुस्तके केंद्रामार्फत महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच तीन वर्तमानपत्रेही अभ्यासिकेत विद्यार्थ्यांसाठी सुरु आहेत.

राज्यसेवा पूर्व परीक्षा व संयुक्त पूर्व परीक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची पूर्वतयारी व्हावी म्हणून टेस्ट सिरीज आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या एकूण १८ टेस्ट घेण्यात आल्या. यावर्षी खालील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केले.

१. सागर उंबरे: कनिष्ठ अभियंता, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अहमदनगर

२. एकनाथ गंभिरे: पशुवैद्यक सहाय्यक, सातारा

(प्रा. सुरेश मालुंजकर)
समन्वयक,
नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र

# रसायन शास्त्र विभाग

## अहवाल २०१९-२०

शैक्षणिक वर्षामध्ये तृतीय वर्ष विज्ञान (रसायनशास्त्र) या वर्गात १०२ तर पदव्युत्तर रसायनशास्त्र भाग १ व २ या वर्गांमध्ये प्रत्येकी २४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. युनेस्कोतर्फे २०१९ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय आवर्तसारणी वर्ष' म्हणून साजरे करण्यात आले होते. त्यानिमित्ताने जग भरात विविध उपक्रम वर्षभरात आयोजित करण्यात आले. रसायनशास्त्र विभागातर्फे ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

अमृतवाहिनी कॉलेज ऑफ फार्मसी, संगमनेर येथील प्रा. महादेव सुरवसे यांचे 'मूलद्रव्यांचे औषधनिर्माण शास्त्रातील महत्व' या विषयावर व्याख्यान झाले. विभागातील प्रा. संदेश कासार यांचे 'आवर्तसारणीचा इतिहास' या विषयावर तर प्रा. पंकज नाईकवाडी यांचे 'आवर्तसारणीतील क्लृप्त्या' या विषयावर व्याख्यान झाले.

आवर्तसारणीवर आधारित बहुपर्यायी 'प्रश्नमंजुषा' घेण्यात आली. एकूण ३३८ विद्यार्थ्यांनी त्यामध्ये सहभाग घेतला. विभागातील तृतीय वर्ष व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'लेक्चर कॉम्पेटीशन' चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण २७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. 'अॅरेंज द पेरीऑडीक टेबल' ही स्पर्धाही घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण १८ विद्यार्थी सहभागी झाले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाच्या वतीने प्रथम वर्ष पदवी विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी 'केमियाड' या परीक्षेचे आयोजन केले जाते. यावर्षी महाविद्यालयातील १०८ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.

विभागाच्या वतीने तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'सर्टिफिकेट कोर्स इन डेअरी अॅण्ड अॅग्रिकल्चर केमिस्ट्री' हा पूरक अभ्यासक्रम राबविण्यात आला. एकूण ७० विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला. विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी 'विभागीय ग्रंथालय' सुरु करण्यात आले आहे. विभागातील प्राध्यापकांनी विविध राष्ट्रीय, राज्यस्तरीय व विद्यापीठ स्तरावरील चर्चासत्रे, परिषदांमध्ये सहभाग घेतला.

(डॉ.संजय ताकटे)
विभाग प्रमुख

# राष्ट्रीय सेवा योजना
## अहवाल २०१९-२०

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एकक मान्यतेनुसार २५० स्वयंसेवकांना प्रवेश देण्यात आला. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रचार व प्रसार करणे, युवकांच्या मनात सामाजिक बांधिलकी निर्माण करणे,श्रम प्रतिष्ठा जोपासणे, युवकांमध्ये नेतृत्व गुण विकसित करणे, पर्यावरण रक्षण करणे, जलसंवर्धन करणे, युवकांमध्ये स्वावलंबन विकसित करणे, स्वच्छता, युवकांमधील कला गुणांना वाव देणे व त्यांचा सर्वांगीण विकास करणे, या सारखे उद्देश समोर ठेवून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात आले.

कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. डॉ. सुनिल मोहटे यांची तर सहकार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा.भानुदास खताळ, प्रा. डॉ. सौ. महेजबीन सय्यद यांची नेमणूक करण्यात आली. वर्षभर राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ. संजय ताकटे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, स्वयंसेवक इत्यादींचे विशेष सहकार्य लाभले.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून वर्षभर खालीलप्रमाणे विविध उपक्रम राबविण्यात आले.

**नियमित कार्यक्रम**

**१.आंतरराष्ट्रीय योग दिवस** - दि.२१ जून २०१९ हा आंतरराष्ट्रीय योग दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला.योग व प्राणायाम यांची प्रात्याक्षिके करण्यात आली.राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**२.वृक्षारोपण** - दि.१४ ऑगष्ट २०१९ या दिवसी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यापीठ दत्तक गाव मौजे.तांभोळ ठिकाणी ८०० वृक्ष व ५००० बियांची लागवड तुळजाभवानी मंदिराच्या टेकडीवर करण्यात आली. या उपक्रमात सर्व स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**3.स्वच्छता पंधरवडा** - दि.१ ते १५ ऑगष्ट २०१९ या कालावधीत स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात आला व स्वयंसेवकांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. या निमित्ताने महाविद्यालयातील ग्रंथालय, वर्ग खोल्या आणि महाविद्यालय परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच बसस्थानक, विश्रामगृह, आरोग्य केंद्र या सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. अकोले शहरातून स्वच्छता दिंडी काढण्यात आली व

अकोले बसस्थानकावर पथनाट्य सादर करण्यात आले.

**४. गणेशमूर्ती विसर्जन व निर्माल्य दान उपक्रम** – दि.१२ सप्टेंबर २०१९ रोजी जल प्रदूषण टाळून पर्यावरण पूरक गणेशमूर्ती विसर्जन घडून आणण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने गणेशमूर्ती व निर्माल्य दान स्वीकारण्यात आले. दिवसभरात स्वयंसेवकांनी ८३३ गणेशमूर्ती आणि ०३ ट्रॅक्टर निर्माल्य जमा केले. या उपक्रमात सर्व स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**५.रक्तदान शिबीर** – दि.०१ जून २०१९ रोजी अर्पण रक्तपेढी ,संगमनेर व राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर पार पडले.यात ४४ पिशव्या रक्तदान झाले. दि. १७-१-२०२० रोजी राष्ट्रीय युवा सप्ताह निमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले त्यात ६८ पिशव्या रक्त संकलन झाले.

**६.राष्ट्रीय सेवा योजना** : दिन – दि.२४ सप्टेंबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला.या निमित्ताने मा. स्वामीराज भिसे रा.पुणे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

**७.एड्स जनजागृती** – दि-०९ ऑगस्ट २०१९ रेड रिबन क्लब ची स्थापना करण्यात आली व श्री.डी.के.भरसठ, श्री.एन.बी.भडांगे यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

दि.२ डिसेंबर २०१९ रोजी जागतिक एड्स दिनानिमित्ताने महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन घेण्यात आले होते. दि-१४ डिसेंबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यापीठ दत्तक गाव मौजे.तांभोळ ठिकाणी एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली.

**८. राष्ट्रीय युवा सप्ताह** – दि.१२ ते १८ जानेवारी २०२० कालावधीत या स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय युवा सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताह कालावधीत निबंध, पोस्टर व वक्तृत्व या सारख्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. याशिवाय स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याचा परिचय स्वयंसेवकांना करून देण्यासाठी व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

**९. राष्ट्रीय मतदार जागृती दिन** – दि. २५ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय मतदार जागृती दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने अकोले शहरात मतदार जागृती फेरी काढण्यात आली . शिवाय महाविद्यालयात नवमतदार नाव नोंदणी करण्यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

**१०. माजी स्वयंसेवक मेळावा** – दि. २६ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माजी स्वयंसेवकांनी स्वयंस्फुर्तीने एकत्र येवून मेळाव्याचे आयोजन केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी महाविद्यालयाच्या रासेयो विभागाला अहमदनगर जिल्यातील उत्कृष्ट एकक तर कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.सुनिल मोहटे यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी हा पुरस्कार जाहीर

केल्यामुळे या मेळाव्यात अभिनंदनाचा ठराव मांडला.या वेळी अनेक स्वयंसेवकांनी आपली मनोगते व्यक्त केली.

**११. गड संवर्धन व स्वच्छता अभियान** – २३ फेब्रुवारी २०२० रोजी रासेयो च्या वतीने तालुक्यातील पट्टाकिल्ला ( विश्रामगड ) येथे दुर्ग संवर्धन व स्वच्छता अभियान राबविले.या मोहिमेत मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा जमा करून त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात आली .

**विशेष शिबीर :-**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबीर दि.८ ते १४ डिसेंबर २०१९ या कालावधीत तालुक्यातील मौजे तांभोळ या गावी घेण्यात आले. या शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या १२५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. शिबीर कालावधीत ग्राम स्वच्छता, सलग सम पातळी चर, शोषखड्डे, वनराई बंधारा, सांडपाण्याचे व्यवस्थापन इत्यादी श्रमाची कामे करण्यात आली. त्याच बरोबर साक्षरता, व्यसनमुक्ती, हुंडाबंदी, बेटी बचाओ–बेटी पढाओ, अंधश्रद्धा निर्मूलन याबाबत पथनाट्य व सांस्कृतिक कार्यक्रम या माध्यमातून जनजागृती करणारे उपक्रम राबविण्यात आले. तसेच शिबीर कालावधीत नामवंत व्याख्यात्यांची विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. या शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी जवळपास २,२६,००० रुपये किमतीची कामे केली. मा. जे. डी. आंबरे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शिबिराचे उद्‍घाटन झाले व श्री.युवराज चव्हाण (सरपंच, तांभोळ) यांचे अध्यक्षते खाली या शिबिराचा समारोप झाला. या शिबिराच्या यशश्वितेसाठी मा.प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व सहकारी कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक, श्री वसंत जेडगुले, सर्व स्वयंसेवक, समस्त ग्रामस्थ तांभोळ यांचे विशेष सहकार्य लाभले.

# मराठी विभाग

## अहवाल २०१९–२०

या शैक्षणिक वर्षात मराठी विभागांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात १५ ऑक्टोबर 'वाचन प्रेरणा दिन' या दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शन, ग्रंथ परीक्षण, पुस्तक वाचन, पत्र लेखन इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. १ जानेवारी ते १५ जानेवारी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त, मराठी विभागाच्या वतीने काव्य वाचन, निबंध, वक्तृत्व, अभिनय, कथाकथन, पोस्टर इ. स्पर्धा घेण्यात आल्या. त्याला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांसाठी राजूर, नारायणगाव, सांगली, नाशिक इ. ठिकाणी राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय पातळीवर स्पर्धेसाठी पाठवले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले.

२७ फेब्रुवारी मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त रांगोळी, मेहंदी, पोस्टर, नृत्य, काव्य गायन, उखाणे स्पर्धा, भारुड, पोवाडे, सांस्कृतिक पारंपरिक वेशभूषा इ.स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच १ जानेवारी ते ८ फेब्रुवारी पर्यंत मराठी विभाग आयोजित मराठी व्याकरण कोर्स घेण्यात आला. या सर्व कार्यक्रमांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर शेळके यांनी मार्गदर्शन व प्रोत्साहन केले. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रंजना कदम, प्रा. डॉ. सुनिल घनकुटे, प्रा. डॉ. विजय काळे, प्रा. कोमल गडाख या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली.

(प्रा.डॉ.रंजना कदम)
विभाग प्रमुख

# विद्यार्थी आरोग्य सेवा योजना

## अहवाल २०१९-२०

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे नियमानुसार आपल्या महाविद्यालयातील प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान, वाईन टेक्नॉलॉजी, बी.बी.ए. (कॉम्पुटर अप्लिकेशन), बी.सी.एस., बी.बी.ए. या वर्गातील सर्व विद्यार्थी – विद्यार्थिनींची सक्तीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश सहाणे व डॉ. निलीमा हांडे यांचेकडून ही वैद्यकीय तपासणी २८, २९, ३० व ३१ ऑगस्ट २०१९ या कालावधीत करण्यात आली. या तपासणीत वैद्यकीय दोष आढळून आलेल्या विद्यार्थ्यांना संबंधित तज्ञ डॉक्टरांकडे पाठविण्यात आले. या तपासणीत गंभीर स्वरूपाचे आजार आढळून आले नाही. ४८३ विद्यार्थी व ४५३ विद्यार्थिनी अशा एकूण ९३६ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या कामी योजनेतील सहकारी प्राध्यापक प्रा. डॉ. सौ. आर. एम. कदम , प्रा. डॉ. सौ. एम. डी. सय्यद , प्रा. व्ही. के. भांगरे ,प्रा. एस. जी. मुठे, प्रा. डी. डी. देशमुख, प्रा. सौ. सोनाली पुंडे, प्रा. सौ. आर.एस.लांडगे, प्रा. सौ. के. एस. राठी तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचारी शरद कडलग, सखाराम पथवे यांचे सहकार्य लाभले.

प्रा. बाळासाहेब मेहेत्रे
संयोजक
विद्यार्थी आरोग्य सेवा योजना

# विद्यार्थी मंडळ

## अहवाल २०१९-२०

वरिष्ठ महाविद्यालय वार्षिक स्नेहसंमेलन २०१९-२०२० हे मंगळवार दिनांक २८/ ०१/२०२० ते गुरुवार दिनांक ३०/०१/२०२० या कालावधीत घेण्यात आले. वार्षिक स्नेहसंमेलनातील पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. पद्मश्री शरदराव काळे ज्येष्ठ शास्त्रज्ञ हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री मधुकररावजी पिचड साहेब, माजी आदिवासी विकास मंत्री तथा कार्यकारी विश्वस्त अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी अकोले हे होते. तसेच संस्थेचे कायम विश्वस्त मा. श्री वैभवराव पिचड साहेब, माजी आमदार तथा कायम विश्वस्त आणि मा. श्री सीताराम पाटील गायकर साहेब, अध्यक्ष अहमदनगर जिल्हा सहकारी बँक अहमदनगर तथा कायम विश्वस्त अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी अकोले हे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री जे.डी. आंबरे पाटील, उपाध्यक्ष मा. श्री मधुकरराव सोनवणे, सेक्रेटरी मा. यशवंतराव आभाळे, सहसेक्रेटरी मा.ॲड्. भाऊसाहेब गोडसे, खजिनदार मा. एस. पी. देशमुख, संस्थेचे सदस्य मा. सौ. कल्पनाताई सुरपुरिया, मा. सुधाकर देशमुख, मा. ॲड्. आनंदराव नवले, मा. बाळासाहेब मोर, मा. आरिफभाई तांबोळी तसेच शिक्षणाधिकारी मा. संपतराव मालुंजकर, एम. बी. ए.चे डायरेक्टर मा. डॉ. प्रशांत तांबे, पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य मा. डॉ. पल्हाडे सर, आय.टी.आय.चे प्राचार्य मा. सातपुते सर, परफेक्ट इंग्लिश मेडीयम स्कूलच्या प्राचार्या मा. सौ. नवले मॅडम उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. मान्यवरांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर शेळके सर यांनी केले. प्रमुख पाहुन्यांचा परिचय महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय ताकटे सर यांनी केले. अगस्त्य सन २०१८ १९ चे प्रकाशन मा. पद्मश्री डॉ. शरदराव काळे आणि मा. श्री मधुकररावजी पिचड साहेब यांच्या शुभहस्ते झाले. विशेष पुरस्काराची घोषना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेळके सर यांनी केली. त्यानंतर नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र – प्रा. सुरेश मालुंजकर, शैक्षणिक पारितोषिक वितरण –डॉ. राहूल वाघमारे, वार्षिक स्पर्धा– प्रा. विश्वनाथ कोटकर, क्रीडा स्पर्धा– डॉ. राहूल भोसले, कला मंडळ– प्रा. डॉ. सुनील घनकुटे, राष्ट्रीय छात्र सेना– प्रा. सचिन पाळंदे, राष्ट्रीय सेवा

योजना- प्रा.डॉ. सुनील मोहटे इत्यादींनी पुरस्काराचे वाचन केले.

दिनांक २८/०१/२०२० ते दिनांक ३०/०१/२०२० या कालावधीत नाटक, साडी डे, टाय डे, कवि कट्टा, शेरो-शायरी, मिसमॅच डे, राष्ट्रीय एकता रॅली, अन्नकोट, रांगोळी स्पर्धा, शेला पागोटे आणि विविध गुणदर्शन इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच भूगोल विभागाने निबंध व सामान्यज्ञान स्पर्धा घेतल्या. मराठी विभागाने काव्य वाचन, वक्तृत्व, कथा-कथन, निबंध, पत्रलेखन, पारिभाषिक संज्ञा, पुस्तक परीक्षण, पोस्टर व म्हणी स्पर्धा घेतल्या. राज्यशास्त्र विभागाने वक्तृत्व, निबंध, पोस्टर इत्यादी स्पर्धांचे आयोजन केले. विज्ञान मंडळाने निबंध स्पर्धा घेतल्या. आयक्युएसी विभागाने सर्व विभागांसाठी महाविद्यालयात लेक्चर कॉम्पिटिशन स्पर्धा घेतली.

वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सौ. महेजबिन सय्यद, प्रा. संदेश कासार व प्रा. डॉ. नितिन आरोटे यांनी केले. कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या मान्यवरांचे आभार प्रा. देवदत्त शेटे यांनी मानले. शेवटी प्रा. महेंद्र बानाईत यांनी वंदेमातरमाने कार्यक्रमाची सांगता केली.

प्रा.विश्वनाथ कोटकर
विद्यार्थी मंडळ प्रमुख

# नारी मंच
## अहवाल २०१९-२०

विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्याचप्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा या हेतूने महाविद्यालयातील 'नारीमंच' वर्षभर कार्यरत असते. नारीमंच च्या माध्यमातून विविध विषयांवर व्याख्याने, कार्यशाळा असे उपक्रम राबविले जातात.तसेच विद्यार्थिनींमध्ये आत्मनिर्भरता यावी, त्यांना समाजामध्ये निर्भयपणे वावरता यावे यासाठी त्यांना विविध ठिकाणी उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास उद्युक्त केले जाते.

### १. महिला सबलीकरण आरोग्य जागर :-

सोमवार, दि. २३ जुलै २०१९ रोजी विद्यार्थिनींसाठी महिला सबलीकरण (आरोग्य जागर) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. सौ भावना अंजनकर, स्त्री रोग तज्ज्ञ, मुंबई, व त्यांचे असिस्टंट, श्री. आशिष दराडे यांनी विद्यार्थिनींना आरोग्याचे महत्व समजून सांगितले, कोणकोणत्या प्रकारच्या अन्नाचा जेवणात समावेश असावा, त्याचबरोबर मासिक पाळी, त्या काळात होणारे बदल व त्या काळात घ्यावयाची काळजी या संबंधी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

### २. नेटवर्किंग ॲण्ड डिजिटल ऑनलाईन मार्केटिंग-

शुक्रवार दि. २०/१२/२०१९ रोजी, सौ मयुरी धुमाळ (उद्योजक, अकोले) व श्रीमती वसुंधरा देशमुख वाकचौरे (विभागीय व्यवस्थापक, ओरीफ्लेम, मुंबई) यांनी विद्यार्थिनींना, शिक्षण घेत असतानाच पैसे कमविण्याची संधी ऑनलाईन व डिजिटल मार्केटिंग च्या माध्यमातून प्राप्त होत असते, घर बसल्या विद्यार्थी, विद्यर्थी केवळ चांगल्या इंटरनेट च्या माध्यमातून स्वतःच करिअर घडू शकतात. अशा प्रकारच्या व्यावसायिक संधी संबंधी मार्गदर्शन केले.

### 3.माझी आई शाळा पाही-

८ मार्च, जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दरवर्षी महाविद्यालयात My mother in My College (माझी आई शाळा पाही) हा उपक्रम साजरा केला जातो. विद्यार्थ्यांच्या मत भगिनींना महाविद्यालयात आमंत्रित करून, ज्या ठिकाणी त्यांचा पाल्य शिक्षण घेतो/घते ते महाविद्यालय, प्राचार्यांची केबिन, कॉन्फरन्स हॉल, ग्रंथालय, वर्गखोल्या, कै. के.बी.दादा देशमुख सभागृह इ. ठिकाणं दाखविली. कै. के.बी.दादा देशमुख सभागृहामध्ये विद्यार्थ्यांच्या समस्या, व त्यांच्या भावी करीअर संबंधी मा. प्राचार्य शेळके सर यांनी या प्रसंगी

मोलाचे मार्गदर्शन केले.

**४. स्वयंसिद्धा, बारामती–**

२६ ते २९ डिसेंबर २०१९ या कालावधीत शारदाबाई पवार महील महाविद्यालय, बारामती ये संपन्न होणाऱ्या युवती संमेलन 'स्वयंसिद्धा' मध्ये महाविद्यालयातील ७ विद्यार्थिनींनी सक्रीय सहभाग नोंदवला.

**५.निर्भय कन्या अभियान :**

गुरुवार, दि. २६ डिसेंबर २०१९ रोजी ॲड. मनोहरराव देशमुख कॉलेज, राजूर येथे संपन्न झालेल्या निर्भय कन्या अभियानात महाविद्यालयाच्या २१ विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवला.

हे सर्व उपक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी मा. प्राचार्य. डॉ. भास्कर शेळके व उप प्रा. डॉ. संजय ताकटे, यांचे मार्गदर्शन व डॉ. रंजना कदम, प्रा. वर्षा काकड, प्रा. सीमा मोरे, प्रा. शितल गोडगे, प्रा.पूनम वैद्य, प्रा. कोमल गडाख, प्रा. विद्या वाकचौरे, इ. चे सहकार्य लाभले.

**६.तनिष्का**

उपक्रमांतर्गत प्रत्येक महिला प्राध्यापकाला ६०-७० विद्यार्थिनी दत्तक म्हणून देण्यात येतात. या विद्यार्थिनीसोबत दर आठवड्याला कोणत्याही एका नियोजित दिवशी एकत्र अनौपचारिक सभा घेतली जाते. त्याद्वारे विद्यार्थिनींना बोलते केले जाते, त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर चर्चेच्या स्वरुपात उपाय सुचविले जातात. त्याच बरोबर विविध उपक्रम आयोजित करून त्यांच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक विभाग, प्रत्येक प्राध्यापिका वेगवेगळे उपक्रम आयोजित करते.

तनिष्का हा उपक्रम राबविण्यासाठी मा. प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ. संजय ताकटे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच प्रा. कदम, प्रा. काकड, प्रा. गोडगे, प्रा. शिंदे, प्रा. गुंजाळ, प्रा. मोरे, प्रा. मुटकुळे, प्रा. भालेराव, प्रा. देशमुख, प्रा. वैद्य, प्रा. गडाख, प्रा. वर्पे, प्रा. बंगाळ, प्रा. आरोटे, प्रा. कोटकर, प्रा. दोरगे, प्रा. नाईकवाडी, प्रा. शेटे इ. चे मोलाचे सहकार्य लाभले.

(डॉ.महेजबिन सय्यद)
विभाग प्रमुख

# युवा माहिती दूत
## अहवाल २०१९–२०

बुधवार दि. ४/९/२०१९ रोजी अनुगामी लोकराज्य महाभियान, अनुलोम, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, 'युवा माहिती दूत' उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे, श्री बाळासाहेब मुळे, 'अनुलोम', शिर्डी उपविभाग प्रमुख, यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. शासना मार्फत अनेकविध योजना तयार केल्या जातात व राबविल्या जातात. पण ज्यांच्यासाठी त्या बनविलेल्या असतात त्या लाभार्थींपर्यंत त्या पोहोचत नाहीत. विद्यार्थ्यांना या योजनांसंबंधी माहितीचे दूत बनवून अकोल्यातील विविध गावांतील लाभार्थ्यांपर्यंत या योजनांची माहिती पोहोचविण्याचा प्रयत्न केला गेला. यात विविध विभागाच्या १५६ विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला.

या उपक्रमासाठी मा. प्राचार्य डॉ. शेळके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच श्री विजय वाघ (अनुलोम– भाग जनसेवक, अकोले) रा. से. यो. चे समन्वयक डॉ. सुनील मोहोटे, वि. वि. मंडळाचे अध्यक्ष डॉ. राहुल वाघमारे, प्रा. भानुदास खताळ, डॉ. विजय काळे, प्रा. गणेश भांगरे, प्रा. वर्षा काकड, प्रा. विद्या वाकचौरे यांचे सहकार्य लाभले.

(डॉ.महेजबिन सय्यद)
विभाग प्रमुख

# आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

## अहवाल २०१९-२०

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने प्रत्येक वर्षी ज्ञान विस्तार व्हावा म्हणून शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतीक कार्यक्रम घेतले जातात. तसेच विविध कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. प्रत्येक कार्यक्रमासाठी विद्यापीठाकडून रु. ५००० मानधन दिले जाते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. विजय शेडगे यांनी काम पाहिले. या वर्षी एकूण तीन व्याख्याने घेण्यास महाविद्यालयाला मंजुरी देण्यात आली. दि. १० जाने.२०२० रोजी 'कुमारवयीन मुलामुलींचे शिक्षण' या विषयावर व्याख्यान झाले. त्यामध्ये मा. ॲड. निशा शिवूरकर, संगमनेर व मा. डॉ. असिफ तांबोळी, अकोले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अ.ता.एज्यु.सो. अध्यक्ष मा. जे. डी. आंबरे पाटील यांनी भुषवले.

त्यानंतर १८ जाने. २०२० रोजी 'महिला सबलीकरण' या विषयावर मा. प्रिया थोरात, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नाशिक व मा. डॉ. रमा कुलकर्णी, अकोले यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून अ.ता.एज्यु.सो. सहसचिव ॲड.भाऊसाहेब गोडसे उपस्थित होते. तसेच १३ फेब्रुवारी २०२० रोजी 'कायदा साक्षरता' या विषयावर मा. ॲड. सौ. एस. व्ही. गिरी, अकोले व मा. ॲड. भाऊसाहेब गोडसे, अकोले यांनी उपस्थित सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींना अनमोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मा. जे. डी. आंबरे पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनराज हाडुळे यांनी केले. वरील तीनही व्याख्यांनाचा विद्यार्थ्यांनी पुर्णपणे लाभ घेतला व त्यांच्या ज्ञानात भर पडली. या ज्ञानांचा त्यांच्या जीवनात नक्कीच उपयोग होणार आहे.

(प्रा. डॉ.विजय शेडगे)
कार्यक्रम समन्वयक

# कनिष्ठ महाविद्यालय
## अहवाल २०१९-२०

**प्रवेश परीक्षा उन्हाळी वर्ग समिती व अगस्ति पॅटर्न**

११ वी विज्ञान समन्वयक
प्रा . चांगदेव डोंगरे (१२ वी विज्ञान)
प्रा.भिमाजी पळसकर (११ वी विज्ञान)
सदस्य : प्रा . विवेक वाकचौरे,
प्रा. सचिन बिबवे

महाविद्यालयाचा मानबिंदु 'अगस्ती पॅटर्न' व प्रवेश प्रक्रिया (सी.ई. टी.) या विभागाच्या वैशिष्टयपूर्ण नोंदी -

१. अत्यल्प फी मध्ये १० एप्रिल पासून उन्हाळी वर्ग सुरू केले.

२. पालक मेळाव्याचे आयोजन करून ध्येयधोरणे ठरविले व शिक्षक पालक संघाची स्थापना करून दर महिन्याला बैठक घेतली.

३. शिक्षक पालक गट तयार करून प्रत्येक शिक्षकाला ३० विद्यार्थ्यांचे पालकत्व देऊन मुलांमधील गुणवत्ता, शिस्त, अनुपस्थिती या संदर्भात पालकांबरोबर फोनद्वारे चर्चा केली.

४.वर्षभर प्रत्येकप्रकरणावर आधारीत घटक चाचणी, गृहपाठ नियोजन करून विद्यार्थ्याकडून पूर्ण करून घेण्यात आले.

५.सराव परीक्षा नियोजन -जून, मध्य सत्र, प्रथम सत्र, डिसेंबर, जानेवारी (पूर्वपरीक्षा) यांची तंतोतंत अंमलबजावणी केली.

६.तज्ज्ञ मार्गदर्शक व्याख्यान - बोर्ड परीक्षेच्या दृष्टिने व १२ वी नंतर होणाऱ्या मेडिकल व इंजिनिअरींग तसेच इतर प्रवेश परीक्षा संदर्भात पुणे, नाशिक, संगमनेर येथील तज्ञ मर्गदर्शकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

७.विद्यार्थ्यासाठी बुक -बॅक सुविधा व सर्व परीक्षांचे ऑनलाईन फॉर्मस मोफत भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

८.निकाल व गुणवत्ता - विद्यार्थ्यांना ऑनलाईन व ऑफलाईन निकाल दिला.

९.दोन ग्रूपचे नियोजन करून मार्गदर्शन वर्गाचे नियोजन केले.

१०.बोर्ड परीक्षेनंतर नियोजन करण्यात आले.

अत्यल्प फी व ठरविलेल्या ध्येयधोरणांची वर्षभर अंमलबजावणीमुळे भूषणावह निकाल व यशाची परंपरा आहे. विभागास प्रा. वाकचौरे व प्रा. बिबवे, सर्व वर्गशिक्षक व विषयशिक्षक यांचे सहकार्य लाभले.

**क्रीडा समिती :-**

अध्यक्ष : प्राचार्य डॉ. भास्कर शेळके
कार्यकारी अध्यक्ष :
प्रा. काळण नंदलाल (पर्यवेक्षक)
सदस्य :- प्रा . सुनील टिक्कल
प्रा. वसंत पवार
सौ. संगिता नवले
प्रा .जालिंदर ढोकरे
प्रा.योगेश उगले
प्रा .शिरीष डावखर
क्रीडा विभाग प्रतिनिधी
कु . बाणाईत ओम नितीन

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात विविध खेळांचे संघ तयार करून तालुकास्तर, जिल्हास्तर, विभागीय स्तर, राज्य स्तरावर पाठविण्यात आले . सॉफ्टबॉल, बुध्दीबळ, बॅडमिंटन, बेसबॉल, खो-खो, कबडडी, नेटबॉल, टग ऑफ वॉर, कराटे, कुस्ती इ . स्पर्धासाठी राज्यस्तर व

राष्ट्रीय स्तरावर संघ व स्पर्धक पाठविण्यात आले.

कबड्डी (मुले) -दि. २७ व २८ ऑगस्ट २०१९ रोजी तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकाविले व जिल्हास्तरीय स्पर्धा दा. ह. घाडगे पाटील विद्यालय, नेवासा फाटा येथे आपला संघ सहभागी झाला. बेसबॉल (मुले) -जिल्हास्तरीय स्पर्धा आबासाहेब काकडे विद्याल, शेवगाव येथे आपल्या महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला. तायक्वांदो - जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा भाग्योदय मंगल कार्यालय केडगाव, अहमदनगर येथे आपल्या महाविद्यालयाचे मुले व मुली दोन्ही संघ सहभागी झाले. कु. नवले आदित्य कैलास (मुले) व देशमुख संजना संजय, कानवडे ऋतिका साहेबराव (मुली) हे जिल्हास्तरीय तायक्वोंदो स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली व आपला संघ सहभागी झाला. बॅडमिंटन (मुले) - अहमदनगर येथे झालेल्या जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी भाईक अभिजीत भास्कर या खेळाडूची निवड झाली व सहभाग नोंदविला. टेनिक्राईट (मुली) - क्रीडा संकूल संगमनेर यथे झालेल्या जिल्हास्तरीय टेनिक्राईट स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी कुमारी शेटे श्वेता शिवाजी हिची निवड झाली. कुस्ती (मुली) - सर्वोदय विद्यामंदीर राजूर येथे झालेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये गिऱ्हे पल्लवी भरत हिने यश संपादन करून जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये दा. ह. घाडगे पाटील नेवासा येथे सहभाग नोंदविला.

(मुले) - आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव येथे झालेल्या जिल्हास्तरीय सॉफ्टबॉल विभागीय स्पर्धेसाठी बाणाईत ओम नितीन याची निवड झाली . तसेच महाराष्ट्र सॉफ्ट बॉल संघटनेच्या वतीने ठाणे येथे झालेल्या

सॉफ्टबॉल राज्यस्तरीय स्पर्धेत कु . कुणाल स्वराज भारत या खेळाडूची निवड झाली .

ॲथलेटिक्स (मैदानी स्पर्धा)- जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा क्रीडा संकूल अहमदनगर येथे पार पडल्या यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा रिले संघ ४ द १०० मीटर धावणे - तृतीय क्रमांक पटकाविला . संघ - मुले- १. वाकचौरे सुशांत किरण (४ द १०० मीटर रिले),२. पांडे प्रसाद रोहिदास (४ द १०० मीटर रिले),३. देशमुख स्वप्निल उत्तम (४ द १०० मीटर रिले) वार्षिक क्रीडा स्पर्धा -

सालाबाद प्रमाणे याही वर्षी वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयेजन करण्यात आले. क्रीडा विभागाचे कामकाज करीत असताना वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ. संजय ताकटे, उपप्राचार्य डॉ. सुनील शिंदे, क्रीडा विभाग समिती सदस्य, सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले .

**कला मंडळ**

अध्यक्ष : प्रा .शेटे बाळासाहेब

सदस्य प्रा .रोहिदास चव्हाण,

प्रा.अंजना नवले, प्रा.शिंदे शिवराम

शैक्षणिक वर्ष २०१९ - २० या वर्षी विद्यार्थी -विद्यार्थीनींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात अभिनय स्पर्धा, हिंदी, मराठी गीत गायन, नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले . तसेच ग्लोबल स्टार नवोदय फाऊंडेशन, पुणे (कला अविष्कार) यांच्या वतीने घेण्यात आलेल्या अभिनय स्पर्धेमध्ये राज्यस्तरावर कु . स्नेहल मोहिते या विद्यार्थीनीचा प्रथम क्रमांक आला .

आंतरमहाविद्यालयीन वार्षिक अभिनय स्पर्धेमध्ये कु. वैष्णवी आवारी, हिंदी -मराठी गीत गायन स्पर्धेमध्ये गुरूकुले शुभम व

मंडलीक साक्षी, नृत्य स्पर्धेत एकल व द्वंद्व समूह प्रकारात मंडलीक साक्षी, घुले श्रध्दा व बनकर श्वेताली यांनी प्रथम क्रमांक मिळविला तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम व तीन अंकी नाटक सादर करण्यात आले . विभागास सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले.

**राष्ट्रीय सेवा योजना** + २ स्तर
कार्यक्रम अधिकारी –
प्रा . कडलग अशोक धोंडीबा
सहकार्यक्रम अधिकारी
प्रा . विवेक वाकचौरे
प्रा . तान्हाजी जाधव
प्रा. भूषण जाधव
प्रा. संगिता नवले

(१) दिनांक २१ जून २०१९ फआंतराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये विविध प्रकारचे योगासने प्रात्यक्षिके करून दाखविण्यात आले. प्रा. नंदलाल काळण यांनी योगासनाची प्रात्यक्षिके करून दाखवली. प्रा . सुरेश मालुंजकर यांनी योगासनांचे फायदे सांगितले. या उपक्रमात इ .१२ वीच्या ५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला . (२) दिनांक १ जुलै २०१९ वनमहोत्सव सप्ताहनिमित्त स्वयंसेवकांकरीता दिनांक २ जुलै २०१९ रोजी पर्यावरण शिक्षक प्रा . ऋषीकेश कानवडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी झाडे व त्याचे संगोपनाचे महत्व स्वयंसेवकांना सागितले. दिनांक ५ जुलै २०१९ रोजी सकाळी ८ ते १० यावेळेत स्वयंसेवकांनी वनस्पतीशास्त्र उद्यान येथे स्वच्छता करून वृक्षारोपन केले.

(३) दिनांक ११ जुलै २०१९ जागतिक लोकसंख्या दिवस साजरा करण्यात आला . स्वयंसेवकांनी लोकसंख्या वाढीबद्दलचे होणारे परिणाम, याचे पोस्टर महाविद्यालय परिसरात लावून तदसंबंधीची माहिती दिली .

(४) दिनांक १ जुलै २०१९ दुपारी ३.०० ते ४. ३० या वेळेमध्ये स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरामध्ये स्वच्छता केली.

(५) दिनांक १ ऑगस्ट ते ५ऑगस्ट २०१९ प्रथम वर्ष राष्ट्रीय सेवा योजना प्रवेशाकरीता नोटीस काढून सहभागी होऊ इच्छिणा–या इ .११वी च्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले. त्यामध्ये मुलाखतीचे वेळापत्रक तयार करून राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये प्रवेश देण्यात आलेल्या ५० विद्यार्थ्यांची यादी प्रसिध्द करण्यात आली .

(६) दिनांक ९ ऑगस्ट २०१९– ऑगस्ट क्रांती दिन ३ ते ५ या वेळेमध्ये साजरा करण्यात आला.

(७) दिनांक १४ ऑगस्ट २०१९ भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्व संध्येला ध्वजारोहणाची तयारी दुपारी ३ ते ४.३० या वेळेत स्वयंसेवकांनी केली. साफसफाई करून स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले .

(८) दिनांक १५ ऑगस्ट २०१९ सकाळी ७. ५० वा. महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. तदनंतर झालेल्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. ए . डी. कडलग यांचे मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी केले .

(९) दिनांक २६ ऑगस्ट २०१९ स्वयंसेवकांकरीता भारतीय संविधानावर मुंबई येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड. निलेश खानविलकर व नागेश जाधव यांचे व्याख्यान ११ ते १२ या वेळेमध्ये आयोजित करण्यात आले.

(१०) दिनांक ७ सप्टेंबर सौर ऊर्जादिन २०१९ व २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने आय. आय. टी. मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सौर दिवा तयार करण्याच्या वर्क शॉप साठी राष्ट्रीय सेवायोजनेच्या स्वयंसेवकांना सहभागी करून

घेण्यात आले.

(११) दिनांक १२ सप्टेंबर २०१९ अनंत चतुर्दशी निमित्त प्रवरा नदीवर दिवसभर स्वयंसेवकांनी गणेश मुर्ती व निर्माल्य स्विकारून ते नदीमध्ये टाकू दिले नाही. याकरीता स्वयंसेवकांचे ग्रुप करण्यात आले होते. प्रत्येक ग्रुपने तीन तास काम केले. सकाळी ७ .०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत हे काम सुरू होते. साधारणत: ५०० गणेश मुर्ती स्वयंसेवकांनी स्विकारल्या.

(१२)दिनांक २४ सप्टेंबर २०१९ राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून म्हाळादेवी आरोग्य केंद्र अकोले यांच्यावतीने आरोग्यविषयक जनजागृती व्याख्यान आयोजित करण्यात आले . डॉ . अर्जुन तागड यांनी 'पावसाळ्यात होणारे आजार व ते टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी' याबद्दलची माहीती स्वयंसेवकांना दिली. आरोग्यकेंद्र म्हाळादेवी येथील आरोग्यसेवक सचिन भराट व अनिल सोनार यांनी सहभाग घेतला.

(१३) दिनांक २६ सप्टेंबर २०१९ स्वयंसेवकांनी महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र उद्यान येथे दुपारी ३ ते ५ यावेळेत गवत काढून वृक्ष संवर्धन केले.

(१४) दिनांक २ ऑक्टोबर २०१९ – महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री यांचे जयंती निमित्त त्यांना अभिवादन करून त्यांचे फोटोस पुष्पहार अर्पण करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. भास्कर शेळके यांनी स्वयंसेवकांना संबोधित केले . याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील शिंदे उपस्थित होते.

(१५) दिनांक १४ नोव्हेंबर २०१९ – दुपारी २.०० ते ४.०० या वेळेमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी असलेल्या स्वयंसेवकांची मिटींग घेण्यात आली. कार्यक्रम अधिकारी प्रा. अशोक कडलग यांनी राष्ट्रीय सेवा योजनेबाबत प्रबोधन केले व विशेष हिवाळी शिबीराबाबत स्वयंसेवकांना कल्पना दिली.

(१६) दिनांक १ ते ८ डिसेंबर २०१९ – जागतिक एडस सप्ताह साजरा करण्यात आला. स्वयंसेवकांनी महाविद्यालयात विविध ठिकाणी भित्ति पत्रके लावून महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थीनी यांची एडस आजाराविषयी जागृती केली .

(१७)दिनांक १४ ते २० डिसेंबर २०१९– राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबीर आंबड, ता. अकोले येथे संपन्न झाले. शिबिरादरम्यान दोन उत्कृष्ट स्वयंसेवक व दोन उत्कृष्ट स्वयंसेविका यांची निवड करण्यात आली त्यांची नावे पुढीलप्रमाणे. १. मेंगाळ मच्छिंद्र सीताराम (११ वी कला) २.धुमाळ निशांत दादापाटील (११ वी वाणिज्य) ३. कु. जाधव वैष्णवी रमेश (११ वी विज्ञान) ४. कु . जगधने प्रिया गौतम (११ वी विज्ञान)

(१८)दिनांक ३ जानेवारी २०२० –राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रभातफेरीचे आयोजन केले.

(१९) दि . ३ जानेवारी २०२० –राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आले.

हे सर्व उपक्रम राबविण्यासाठी रा. से. यो. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. तान्हाजी जाधव, प्रा. विवेक वाकचौरे, प्रा. भूषण जाधव, प्रा. संगिता नवले, श्री. वसंत जेडगुले यांचे सहकार्य लाभले.

## विज्ञान मंडळ

सदस्य

प्रा .भाऊसाहेब गायकवाड

प्रा. प्राजक्ता पोखरकर

जागतिक आधुनिकिकरण, तंत्रज्ञान,यंत्र–वाहनांचा अतिवापर यामुळे पर्यावरणाचा –

ह्रास व जीवसृष्टीवर होणारा विघातक परिणाम लक्षात घेऊन पर्यावरण समतोल साधण्यासाठी विज्ञान मंडळातर्फे मौजे अंबड येथे 'सीताफळ', 'चिंच' या वृक्षांची लागवड करण्यात आली . वरील उपक्रमात ११ वी विज्ञान चे सर्व विद्यार्थी व मंडळातील सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले.

*****

**वाणिज्य मंडळ** – प्रा . धिवर अनिल

वाणिज्य विभागातर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले. दि . २६.११.२०१९ रोजी विभागात संविधान दिन साजरा करण्यात आला . तसेच दिनांक ०६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरिनिर्वाण दिना' निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे नियोजन वाणिज्य विभागाचे प्रा. के. व्ही. जाधव यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील शिंदे , प्रभारी पर्यवेक्षक प्रा. बी. एच . पळसकर यांनी आपली मनोगते व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी भीम गीताचे गायन केले. याप्रसंगी प्रा. नवले, प्रा. शेटे, प्रा. डॉ . आरोटे, प्रा. च्व्हाण प्रा. निमसे, प्रा. चौधरी यांनीही आपले विचार थोडक्यात मांडले.

*****

**वाङ्मय मंडळ :–**

– प्रा. सुधीर राक्षे

मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना विविध स्पर्धामध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध झाली .

१.दि. ५ सप्टेंबर (शिक्षकदिन) – न्यु इंग्लिश स्कुल भामाठाण येथे कु. ऋतुजा सुनील हासे या विद्यार्थीनीने निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून रोख ३००० चे पारितोषिक पटकाविले.

२.मा. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याद्वारे 'रेझिंग डे' निमित्त जिल्हा स्तरावर' सोशल मिडिया ही लक्ष विचलित करणारी धोकादायक बाब नाही' या विषयावर वादविवाद स्पर्धेमध्ये कु. वैष्णवी रमेश जाधव हिने द्वितीय क्रमांक मिळवून मुंबई येथे राज्य स्तरावर रूपये एक लाख चे रोख पारितोषिक पटकाविले. या स्पर्धेमध्ये तिला उत्कृष्ट भाषण शैली साठी रूपये पंचवीस हजार चे रोख पारितोषिक मिळाले.

३.वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त निबंध व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली . यामध्ये अनुक्रमे मोहिते जयराम भाऊसाहेब १२ वी कला ब व भांगरे आकाश रामदास १२ वी वाणिज्य ब यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

**विद्यार्थी मंडळ :–**

विद्यार्थी संसद स्थापना गुणवत्तेनुसार १८ वर्गाचे वर्गप्रतिनिधी निवडण्यात आले व त्यानुसार जनरल सेक्रेटरी म्हणून (G.S) बगाड प्रसाद सिताराम (११ वी विज्ञान अ) व विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून (L.R.) कु . ताकटे प्रगती जगदीश (११ वी विज्ञान ब) हिची निवड करण्यात आली .

विद्यार्थी मंडळाचे उद्घाटन दि. ०५ सप्टेंबर २०१९ (शिक्षकदिन) रोजी मा. श्री. संदिप वाकचौरे (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर) यांच्या प्रमुख उपस्थितीत व अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी मा. यशवंतराव आभाळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. मा . प्राचार्य डॉ.शेळके सर यांनी विद्यार्थी मंडळातील सदस्यांना शपथ दिली व शिक्षकदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. संदिप वाकचौरे यांनी आजच्या स्पर्धेच्या काळातील शिक्षणाचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. सुनील मालुंजकर यांनी केले. या प्रसंगी मा. उपप्राचार्य डॉ. सुनील शिंदे सर, पर्यवेक्षक प्रा. नंदलाल काळण सर व सर्व सहकारी प्राध्यापक बंधु–भगिनी उपस्थित होते.

दि.०३ जानेवारी २०२० क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. प्रमुख वक्ते डॉ. नितीन आरोटे यांनी सावित्रीबाई फुले व ज्योतिराव फुले यांचे कार्य याविषयी विशेष मार्गदर्शन केले. तसेच उपप्राचार्य डॉ. सुनील शिंदे यांनी सावित्रीबाई फुले जीवनपट खुला करत विद्यार्थी-विद्यार्थीनींमध्ये शिक्षणाबद्दलची आस्था व प्रेरणा निर्माण केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. रोहिणी डावरे यांनी केले. याप्रसंगी प्रा. रोहिदास चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रा . रोहिणी डावरे यांनी ज्योतिबा -सावित्री विषयक चारोळ्या सादर केल्या. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सुनील शिंदे यांनी 'क्रांतिज्योती माय सावित्री' या स्वलिखित पुस्तकाचे वितरण अनेक विद्यार्थी नींना केले.

दि. २८ जानेवारी २०२० वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त 'सारी डे', 'टाय डे', 'मिसमॅच डे', 'रांगोळी स्पर्धा व अन्नकोट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामधील प्रथम क्रमांक पुढीलप्रमाणे

'सारी डे'- चौधरी प्रिती राजेंद्र (११ वी वाणिज्य) १. 'टाय डे'- कराड प्रदीप मच्छिंद्र (१२ वी कला ब ) ३. 'मिसमॅच डे' घोडके प्रतिक्षा गोरक्ष (११ वी विज्ञान अ) ५.अन्नकोट स्पर्धा - कानवडे ऋतुजा साहेबराव (११ वी विज्ञान अ) (रांगोळी स्पर्धा - गवारी मानसी राजू (११ वी विज्ञान अ)

### वसतिगृह :-

सन २०१९-२० शैक्षणिक धोरणा नुसार विद्यार्थी संख्या टिकवून ठेवण्यासाठी तसेच गळती व स्थगितीचे प्रमाण कमी होण्यासाठी मा अध्यक्ष, सेक्रेटरी व प्राचार्य यांच्या विशेष प्रयत्नातून शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये दुर्गम भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहु नये या उद्देशाने मुले व मुली यांचेसाठी वसतिगृह सुरू करण्यात आले .

मुले वसतिगृह -प्रा . रोहिदास चव्हाण

१२ वी कला - ३ विद्यार्थी

११ वी कला ३७ विद्यार्थी एस. वाय. बी . एस्सी . १ विद्यार्थी

असे एकूण ४१ विद्यार्थी वसतिगृहात जेवण व निवास या सोयीचा मोफत लाभ घेत आहेत .

### मुली वसतिगृह

-प्रा . मोहिनी शिंदे

वर्ग ११ वी - ५१ विद्यार्थीनी

१२ वी -१७ विद्यार्थीनी डिप्लोमा + महाविद्यालय स्तर -४० विद्यार्थीनी अशा एकूण १०८ विद्यार्थीनी वसतिगृहात जेवण व निवास या सोयीचा मोफत लाभ घेत आहेत .

वसतिगृह अधीक्षक म्हणून प्रा. योगिनी बुळे मॅडम काम पहात आहेत . वसतिगृहातील शिस्त, समस्या, कामकाज व उपाययोजना यांच्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधु-भगिनी यांचे वेळोवेळी सहकार्य लाभते . श्री . कोटकर व श्री . औचिते उत्तम प्रकारे वसतिगृहाची निगराणी करतात . आचारी बाळु महाराज हे वसतिगृहातील सर्वच विद्यार्थ्यांना स्वादिष्ट व रूचकर भोजन व्यवस्था पाहतात .

### नियतकालिक विभाग :-

प्रा.शेटे बाळासाहेब सदस्य

प्रा. चांगदेव डोंगरे

प्रा. संभाजी गायकवाड

प्रा. गोरक्ष लांडगे

प्रा. रोहिणी डावरे

दरवर्षीप्रमाणे प्रसिध्द होणा-या महाविद्यालयाच्या 'अगस्त्य' या नियतकालिकासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून लेख, कविता मागविण्यात आल्या . काही ज्वलंत प्रश्नांवर आधारीत विद्यार्थ्यांनी लेख दिले .

मंडळाचे वतीने खालील विषयांवर निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले .

१. आदर्श नागरीक व त्याची कर्तव्ये

२. संभाषण एक कला या स्पर्धेमध्ये पेंडभाजे सलोनी राहुल (१२ वी वाणिज्य 'अ') हिने प्रथम क्रमांक पटकाविला .

*****

**परीक्षा विभाग**

अध्यक्ष : प्रा.देविदास चौधरी

सदस्य : प्रा. संजय लांडगे, प्रा. ऋषिकेश कानवडे, प्रा. विकास निमसे, प्रा.शिवराम शिंदे, प्रा. डॉ. नितीन आरोटे, प्रा. रेखा लांडगे, प्रा. संभाजी गायकवाड, प्रा . सोमनाथ आंबरे, श्री. हेमंत सोनवणे

शै. वर्ष २०१९-२० मध्ये घेतल्या जाणा-या मध्यसत्र, सहामाही, भाषा विषयासाठी तोंडी व भूगोल, विज्ञान विषयासाठी प्रात्याक्षिक परीक्षांचे उत्तम नियोजन करून परीक्षा यशस्वीपणे पार पाडली. तसेच इ.१२ वी वर्गाची सराव परीक्षा जानेवारी महिन्यात घेण्यात आली. इ.११ वी. ची भाषा विषयासाठी तोंडी व भूगोल, विज्ञान विषयासाठी प्रात्याक्षिक, वार्षिक लेखी परीक्षेचे नियोजन करण्यात आले आहे . विभागास सर्व सदस्यांचे उत्तम सहकार्य लाभले .

*****

**विद्यार्थी ग्राहक भांडार**

प्रा. बाळासाहेब शेटे

सदस्य : प्रा. सुनील मालुंजकर,

प्रा. डॉ. अशोक दातीर, श्री.शरद कडलग

विद्यार्थ्यांना वाजवी दरात शैक्षणिक साहित्य मिळावे या दृष्टिकोनातून ग्राहक भांडाराची निर्मिती झाली . त्याला अनुसरूनच विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य, जर्नल्स, वहया, स्टेशनरी योग्य व माफक दरात उपलब्ध करून देण्यात येते. विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात ऑनलाईन प्रवेश दिला जातो. तसेच झेरॉक्सची व्यवस्था करण्यात आली आहे. विभागास महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य यांचे सहकार्य लाभले.

## सेवानिवृत्त कर्मचारी यादी

| अ.नं. | नाव | हुद्दा | निवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रा.बी.बी.देशमुख | सहाय्यक प्राध्यापक | ३१/०५/२०२० |
| २ | प्रा.एन.पी.काळण | पर्यवेक्षक, क.महाविद्यालय | ३१/०१/२०२० |
| ३ | प्रा.बी.एस.शेवाळे | सहाय्यक शिक्षक | ३१/०५/२०२० |

# भावपूर्ण श्रद्धांजली!

सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षात जागतिक किर्तीचे जे साहित्यिक, शास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, कलावंत, संस्थेवर प्रेम करणारे स्नेही, हितचिंतक कालवश झाले, त्यांच्या आत्म्यास आमचे विनम्र अभिवादन!

## धिना धीन धा...!




डी डी सह्याद्री वाहिनीवर सुरु असलेल्या लोकनृत्य धिना धीन धा कार्यक्रमात सादर झालेल्या आदिवासी डांगी नृत्यात सहभागी विद्यार्थी व विद्यार्थिनी मान्यवरांसमवेत.




डी डी सह्याद्री वाहिनीवर सुरु असलेल्या लोकनृत्य धिना धीन धा.. कार्यक्रमात सादर झालेल्या आदिवासी डांगी नृत्यात सहभागी विद्यार्थी व विद्यार्थिनी मान्यवरांसमवेत. सोबत मार्गदर्शक प्रा.डॉ.सुनिल घनकुटे.

साहसे श्री प्रतिवसति !

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,

## अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

ता. अकोले, जि. अहमदनगर (पिन ४२२६०१)

फोन नं. (०२४२४) २२१२४८, २२२७०२

Website : www.agasticollege.com

Email : acsakole2005@gmail.com

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये :

- त्रेचाळीस वर्षाची समद्ध परंपरा
- नॅक मानांकन 'अ' दर्जा प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सर्वोत्कृष्ट संलग्न महाविद्यालय प्रथम पुरस्कार विजेते
- निर्मल महाविद्यालय पुरस्कार प्राप्त
- राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट एकक पुरस्कार प्राप्त
- पदव्युत्तर विभाग व पीएच. डी. मार्गदर्शन केंद्र
- संगणकीकृत सुसज्ज ग्रंथालय
- सुसज्ज ऑडिओ व्हीज्युअल हॉल
- सुसज्ज संगणक प्रयोगशाळा
- आर.डी.परेड, दिल्लीसाठी सातत्याने विद्यार्थी निवड
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र
- 'अगस्त्य' नियतकालिकास सातत्याने विद्यापीठ पुरस्कार
- सेवायोजन मार्गदर्शन व विद्यार्थी ग्राहक भांडार
- सर्व सोयींनी युक्त विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतीगृह
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व अभ्यास केंद्र
- ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया
- कमवा व शिका योजना
- राष्ट्रीय सेवा योजना
- राष्ट्रीय छात्र सेना

